# गिरिमित्र सन्मानार्थींबद्दल

## गिरिमित्र संमेलन २००४

### गिरिमित्र जीवनगौरव
### श्री. हरिश कपाडिया

Harish Kapadia has made a unique contribution to our knowledge of the Himalaya, as editor of Himalayan Journal, one of the most authoritative and comprehensive records of exploratory activity in the Himalaya; through his numerous books and as a leader and organizer of countless expeditions over the years.

His first visit to the Himalaya was almost 45 years ago. He has never locked back since, still trekking and climbing actively. His main contribution to Himalayan climbing has been to explore unknown areas and, in number of cases, to open up climbing possibilities. He has personally climbed more than 30 Himalayan peaks, many of them first ascents. Moreover he has crossed more than 130 Himalayan passes to explore different valleys.

As an expedition leader, he has initiated a series of joint expeditions with climbers from the United Kingdom, France, Japan and the United States to explore and climb throughout the Indian Himalaya.

He is a selfless mountain lover who undertook everything simply for the love of it and not for fame or money. He managed all this while he was a businessman.He continued his passion despite two serious personal injuries and a major family setback in the tragic loss of his young soldier son to terrorism in Kashmir.

He is an explorer in the true traditional mode and has visited almost all the ranges in the Indian Himalaya in last four decades. His explorations have opened new horizons for future mountaineers.

He was elected Honorary Member of the leading Alpine Clubs; of London, USA, Japan and Poland. He was awarded the Indian Mountaineering Foundation Gold Medal in 1993. It is most fitting, that in the year 2003, in which the 50th Anniversary of the first ascent of Everest was celebrated, Harish Kapadia was honoured with the Royal Medal, the “Patron's Medal”, by the Royal Geographical Society 'for contributions to geographical discovery and mountaineering in the Himalayas'. He was the first Indian to receive this highest adventure award after 125 years The President of India honoured him with the prestigious 'Tensing Norgay National Adventure Award” (2003) for Life Time achievements, the highest Adventure Award in India. In 2006 he received the prestigious 'King Albert I Mountain Award' In Switzerland.

Girimitra Sammelan felt honoured to conform upon him "Life Time Achievement Award".

# गिरिमित्र संमेलन २००५

## गिरिमित्र जीवनगौरव
## श्री. शरद ओवळेकर

श्री. शरद ओवळेकर गिर्यारोहकांचे गुरू म्हणूनच ज्यांच वर्णन कराचं असं व्यक्तिमत्व म्हणजे श्री. शरद ओवेळेकर. लैाकिक अर्थानं सर कोणत्याही शाळेचे, महाविदयालयाचे शिक्षक नव्हते, पण चार भिंतीबाहेर डोंगरात फिरणाऱ्या प्रत्येकालाच सर गुरूच होते आणि मार्गदर्शकदेखील.

महाराष्ट्रातल्या कित्येक पिढ्या घडविणाऱ्या ओवळेकर सरांची भटकंती ५०च्या दशकात सुरू झाली.

सुरूवातीस काकांच्या सोबती ने भटकंती तर पुढे राष्ट्रसेवादलाच्या माध्यमातून बरीच भ्रमंती होऊ लागली. सर गिर्यारोहणाकडे वळले ते साधारण १९५५ च्या सुमारास गिरिविहारच्या स्थापनेत सरांचा पुढाकार होता. महाराष्ट्रात प्रस्तरारोहणाचा फारसा प्रसार नसताना सर कर्नाळा सारख्या सुळक्यावर आरोहण करीत असत.

महाराष्ट्रातून आखलेल्या पहिल्याच नागरी हिमालयीन मोहीमेत ओवळेकर सरांचा सहभाग महत्वाचा होता. कारण यापुढच्या काळात संपूर्ण आयुष्यात सरांनी गिर्यारोहकांच्या कित्येक पिढ्या घडविण्याच्या महत्वाच्या कामावर लक्ष केंद्रीत केले.

गिरिविहारच्या माध्यमातून लहान मुलांसाठी शिबिरं, प्रस्तरारोहणांची शिबिर हे सराचं सर्वात महत्वाचं मौलिक कार्य होय. गिरिविहारच्या एकंदर वाटचालीतच सरांचा महत्वाचा सहभाग, होता.

पुढे महाराष्ट्रातून गेलेल्या कांचनजगा व एव्हरेस्ट या महत्वाकांक्षी मोहिमांत सरांचे मार्गदर्शन अतिशय महत्वाचे होते. किबहुना या मोहिमातील कित्येक सभासद सरांचेच विध्याथी होते.

ओवळेकर सरांच्या या भरीव योगदानाबद्दल त्यांना गिरिमित्र जीवनगौरव सन्मानाने गौरविण्यात आले.

## गिरिमित्र जीवनगौरव (मरणोत्तर)
## स्व. श्री. बापूकाका पटवर्धन

बापूकाका या प्रेमळ नावानेच माहिती असणारे हे व्यक्तिमत्व म्हणजे महाराष्ट्राच्या गिर्यारोहण जगताचे अध्वर्यू होत. महाराष्ट्रात गिर्यारोहणाच्या छंदाचे वारे दुरुन देखीलस्पर्श करीत नव्हते तेव्हा १९२५ च्या काळात बापू काका धुळे परिसरातीललकींग च्या टेकड्यांची भटकंती करीत होते. पण बापूकाकांच्या गिरिभ्रमणास खरी सुरुवात झाली ५० च्या दशकात.

आर्मीतून वैद्यकीय अधिकारी पदावरुन निवृत्त झाल्यानंतर सिंहगडाच्या सहवासात त्यांनी गिर्यारोहणाचा ध्यास घेतला. एच.एम. आय. मधून बेसिक व ॲडव्हान्स कोर्स पूर्ण करुन त्याला तंत्रशुद्धतेची जोड दिली. सिंहगड म्हणजे बापूकाकांचे जणू काही अंगणच झाले होते. सह्याद्रीतीलसराव म्हणजे हिमालयातीलमोहिमांची पूर्वतयारी हेच सूत्र त्यांनी अंगी बाणवले होते. मुंबईच्या क्लाईबर्स क्लबशी संलग्न राहून हिमालयीन मोहिमादेखीलहोऊ लागल्या. श्रीकैलाश ही त्यांची पहिली मोठी मोहीम.

दरम्यान पुण्यातीलबी.ओ.बी.पी. मध्ये ते कार्यरत झाले. पुढे ७० मध्ये त्यांनी स्वत: गिरिभ्रमण संस्थेची स्थापना केली आणि मग बापूकाकांच्या हिमालय भटकंतीला खरा वेग आला. गढवालहिमालयातीलगंगोत्री परिसर म्हणजे बापूकाकांचे दुसरे घरच झाले. छोट्या छोट्या शिखरांवर अतिशय तंत्रशुद्ध पद्धतीने मोहिमा आखून त्यांनी संपूर्ण गंगोत्री परिसर अक्षरश: पिंजून काढला.

बापूकाकांची मोहीम म्हणजे थोडक्या साधनसामग्रीत, कमीत कमी पैशात, तंत्रशुद्ध आणि शिस्तबद्धतेचे अगदी प्रतीकच होते. डोंगरातला शिस्तबद्धपणा आयुष्यात देखीलउतरला होता. कोणत्याही गोष्टीचा पुनर्वापर हा तर त्यांचा उत्तम गुण होता. डोंगरात

निव्वळ भटकंती न करता पर्यावरणाचा अभ्यास व पर्यावरण सुसंगत भटकंती याचे ते मूर्तीमंत उदाहरण होते.

जे काही केलं, पाहिलं त्याचं समीक्षणात्मक विवेचन लेखन, नकाशे रेखाटन, पत्रव्यवहार अशा विविध मार्गांने अनुभवाचा संग्रह त्यांनी केला. प्रचंड व्यासंग व पत्रव्यवहारामुळे बापूकाका म्हणजे चालते बोलते ग्रंथालयच होते.

गिर्यारोहण क्षेत्रातीलडॉ. जी. आर. तथा बापूकाका पटवर्धन यांच्या मौलिक योगदानाबद्दलत्यांना गिरिमित्र जीवनगौरव (मरणोत्तर) सन्मानाने गौरविण्यात आले.

## गिरिमित्र गिर्यारोहक - १
## श्री. दिलीप झुंजारराव

दिलीपने १९७८ मध्ये लेडीज माऊंटनियर्स क्लबने आयोजित केलेल्या रॉक क्लाईंबिंग कॅम्पमधे प्रस्तरारोहणाचे प्रशिक्षण घेतले. या कॅम्पमधे श्री. शरद ओळेकर, प्रो. माळी यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. या कॅम्पनंतर त्याने सह्याद्रीतीलसुळके चढाईचा धडाकाच लावला.

१९७९ मध्ये कर्नाळा, ८० मध्ये तावलीचे ३ सुळके आणि पदरचा कलावंतणीचा महाल, ८१ मध्ये नकटा, ८२ मध्ये हडबीची शेंडी, लिंगाणा, कळकराय,४०० फुटी माहुली क्रॅक, ८३ मध्ये माहुली नवरा, ८४ मध्ये तैलबैला दुसरी भिंत, तुंगी, माहुली वजीर, ८५ मध्ये लुज बोल्डर या सुळक्यांवर यशस्वी आरोहण केले. यापैकी कलावंतणीचा महाल, नकटा, माहुली नवरा, तुंगी, माहुली वजीर, लुज बोल्डर या सुळक्यांवर प्रथम आरोहणाचा मान मिळवला.

८५ मध्ये थांबलेली दिलीपची प्रस्तरारोहणाची मोहिम २००५ मध्ये पुन्हा एकदा पूर्णत्वास गेली. प्रसिद्ध लिंगाण्या सुळक्यावर जानेवारी २००५ मध्ये त्याने एकट्याने यशस्वी आरोहण करुन स्वर्गीय संतोष गुर्जर याला आदरांजली वाहिली.

हिमालयातीलमोहिमांमधेही दिलीपने आपला ठसा उमटवला. पिंढारी ग्लेशियर, एव्हरेस्ट बेस कॅम्प, सरहान सांगला असे हिमालयीन पदभ्रमण आणि सेंट्रलपिक, रुदुगैरा, माना, सैफी या हिमालयीन मोहिमा अशी दिलीपच्या खात्यातीलहिमालयीन मोहिमांची नोंद आहे.

सध्या दिलीप नवीन प्रस्तरारोहकांना मार्गदर्शन करण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पडत आहे. त्याबरोबरच फोटोग्राफी, पक्षीनिरिक्षण, चित्रकला या छंदांच्या जोपासनेतही व्यस्त आहे.

गिर्यारोहण क्षेत्रातीलश्री. दिलीप झुंझारराव यांच्या योगदानाबद्दलत्यांना गिरीमित्र गिर्यारोहक सन्मान देऊन गौरविण्यात आले.

## गिरिमित्र गिर्यारोहक - २
## डॉ. मिलिंद चितळे

मिलिंदने मेडिकलकॉलेजमधे असतांना १९८३-८४ सालापासूनच आपल्या डोंगरातीलभटकंतीला सुरुवात केली. १९८५ पासून तो पार्ल्याच्या 9रॅम्बलर्स“ या संस्थेतून डोंगरात भटकायला जाऊ लागला. वैद्यकीय प्रॅक्टीसमुळे हिमालयातीलभटकंतीसाठी वेळ काढणे कठीण जायचे. तरीदेखीलत्याने कुलु खोऱ्यातला पातालसु ट्रेक, दार्जिलिंगच्या माऊंटेनिअरिंग इन्स्टिट्युटमधून बेसिक, ॲडव्हान्स कोर्स पूर्ण केला.

१९८८ मध्ये कांचनजंगा मोहीमेत क्लाईबींग डॉक्टर म्हणून निवड करण्यात आली. ही जबाबदारी त्याने डॉ. रवी रुपवतेंच्याबरोबर यशस्वीपणे पार पाडली. त्या मोहिमेत त्याने कोयलुराम ठाकुर याची पल्मनरी एडिमा आणि चंद्रशेखर तांबट यांची हायपोथर्मिया या जीवघेण्या आजारातून यशस्वी सुटका केली. फ्रॉस्ट बाईट झालेल्या उदय आणि चारुच्या बोटांना योग्य तो प्रथमोपचार देऊन त्यांना मुंबईत आणले आणि पुढीलउपचार करुन सर्व बोटे वाचविली. या एका मोहिमेतच अति उंचावरीलसर्व आजारांचा

प्रत्यक्ष अनुभव घेणारा व त्यावर उपचार करणारा तो भारतातीलदुर्मिळ डॉक्टर ठरला.

१९९०-९१ मध्ये त्याने गिर्यारोहणासाठी प्रथमोपचार शिबिरे घेण्यास सुरुवात केली. अनेक गिर्यारोहण संस्था प्रथमोपचार शिबिरासाठी मिलिंदला बोलावू लागल्या. शिवाय प्रशिक्षण घेतलेल्यांसाठी त्याने सराव शिबिरही आयोजित करण्यास सुरुवात केली. मिलिंदच्या या उपक्रमांमुळे महाराष्ट्रातीलगिर्यारोहकांना शास्त्रशुद्ध प्रथोमपचार शिकण्याचं एक केंद्रच उपलब्ध झाले. हे सर्व उपक्रम मिलिंदने कोणतेही मानधन अथवा पैशाची अपेक्षा न ठेवता केले.

१९९५ मध्ये प्रकाशित झालेल्या 9सांगाती सह्याद्रीचा“ या पुस्तकातीलप्रथमोपचार या पुस्तिकेचे लेखन मिलिंदने केले.

एव्हरेस्ट-९८ मोहिम जाणार हे निश्चित झाल्यावर मोहिमेचा उपनेता व डॉक्टर या दुहेरी जबाबदारीसाठी मिलिंदला विचारणा करण्यात आली. परंतु एव्हरेस्ट-९८ च्या तयारीत त्याचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता. त्यामुळे काम न करता मोहिमेत सहभागी होणे पटत नाही या कारणास्तव त्याने ही जबाबदारी स्विकारण्यास नकार दिला.

गिर्यारोहण क्षेत्रातीलडॉ. मिलिंद चितळे यांच्या योगदानाबद्दलत्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान प्रदान करण्यात आला.

## गिरिमित्र गिर्यारोहक - ३
## श्रीमती उषःप्रभा पागे

उषाने पुण्याच्या बिओबिपी संस्थेतून रॉक क्लाईंबिगचा कॅम्प करुन आपल्या गिर्यारोहणाच्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर ती पुण्याच्या गिरिभ्रमण संस्थेतून डॉ. बापूकाका पटवर्धनांच्याबरोबर भटकंतीला जाऊ लागली. सह्याद्रीतीलभटकंतीबरोबरच तिचा सिंहगडावर रॉक क्लाईंबिगचा नियमित सरावही चालायचा. १९७८ मध्ये तिने लिंगाणा या कठीण सुळक्यावर आरोहण केले. तर कर्नाळा सुळक्यावर एकटीनेच आरोहण केले.

सह्याद्रीबरोबरच तिच्या हिमालयातीलमोहिमा सुरु होत्या. १९७४ मध्ये हनुमान, ७५ मध्ये देवतिब्बा, ७८ मध्ये ॲडव्हान्स माऊंटन क्राफ्ट ट्रेनिंग, पुणे माऊंटेनियर्सबरोबर ७८ मध्येच मुलकिला तर ७९ मध्ये कुलु पुमोरी, ८१ मध्ये दिल्लीच्या रोमेश भट्टाचार्यजीबरोबर लियोपार्गियल, ८२ मध्ये पुन्हा लियोपार्गियल, ८३ मध्ये माना, ८६ मध्ये देवबन, ८६ मध्येच सतोपंथ शोधमोहिम, ८७ मध्येच चतुरंग शिखर, ८९ मध्ये गोलप कांगरी अशा शिखरांवर तिने मोहिमा केल्या. १९८२ मध्ये प्रि एव्हरेस्टसाठी उषाची निवड झाली. त्यात तिने बच्छेंद्री पालसोबत गंगोत्री-१ आणि रुदुगैरा ही शिखरे सर केली.

या सर्व मोहिमांमध्ये १९८६ ची संतोपंथ शोधमोहिम तिच्याकरता खूपच कठीण होती. सतोपंथ शिखर चढाई करतांना डॉ. मिनु मेहता, नंदु पागे, भरत मांगरे या गिर्यारोहकांचे अपघाती निधन झाले. या अपघाताने झालेल्या वैयक्तिक दु:खाने खचून न जाता या गिर्यारोहकांची शोध मोहिम राबवून या सर्व गिर्यारोहकांचे सतोपंथावरच अंतिम संस्कार केले. या मोहिमेनंतर १९८७ मध्ये तिने नंदु पागे स्मृती ग्रंथालय सुरु केले.

उषाच्या स्वभावाचा एक गुणविशेष म्हणजे ती अपयशाने खचून न जाता दुप्पट जोमाने आधीच्या अपयशावर मात करण्यासाठी सतत प्रयत्न करते. उषाच्या मुलकीला आणि लियोपार्गियलया दोन्ही मोहिमा अपयशी झाल्या होत्या. या शिखरांवर तिने पुन्हा मोहिमा आखुन त्या यशस्वी केल्या. तिच्या वैयक्तिक आयुष्यातही तिने दोन वेळा आपला पती गमावण्याचे प्रचंड आघात सहन केले. परंतु त्यातून तिने स्वत:ला आणि कुटुंबाला सावरले.

उषाने पुढाकारानं १९८२ मध्ये पुण्यात गिरीप्रेमी संस्थेची झाली.

उषाने आकाशवाणीमध्ये निवेदक ते स्टेशन डायरेक्टर या पदावर काम केले. या काळात तिने गिर्यारोहण आणि डोगर दऱ्यात राहणाऱ्या आदिवासींचे लोकजीवन आकाशवाणीच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न केले.

गिर्यारोहण क्षेत्रातीलश्रीमती उष:प्रभा पागे यांच्या योगदानाबद्दलत्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान देऊन गौरविण्यात आले.

## गिरिमित्र गिरिभ्रमण
## श्री. धनंजय मदन

१९८० मध्ये पहिल्या रायगड प्रदक्षिणेत धनंजय मदन सहभागी झाला आणि त्यानंतर भारावल्यासारखा किल्ल्यांच्या वाऱ्या करु लागला. १९८५ मध्ये त्याने केव्ह एक्सप्लोरर्सचा रॉक क्लाईबिंगचा कॅप केला आणि त्याच संस्थेतून भटकंती सुरु झाली. १९८६ मध्ये धनंजयने पनवेलमधे निसर्गमित्र संस्थेची स्थापना केली. त्याच वर्षी कर्नाळा परिसरात ६५० वृक्षांचे रोपण करुन पुढे दोन वर्षे त्यांची निगा राखली. सर्पयात्रा, पर्यावरण दिंडी, ज्येष्ठ नागरिकांना वृक्ष भेट अशा उपक्रमांतुन त्याने निसर्ग विषयक प्रबोधनाचे काम सुरु केले. त्याचबरोबर किल्ले स्पर्धा, वन्य जीव सप्ताह, भिंती चित्र स्पर्धा, निबंध आणि चित्रकला स्पर्धा, छायाचित्र प्रदर्शन अशा उपक्रमांचे आयोजन करुन पनवेलकरांना संस्थेशी जोडण्याचा प्रयत्न केला. संस्थेतीलतरुण सदस्यांना प्रोत्साहित करुन लिंगाणा, वानरटोक, माणिकलिंगी, कळकराय, इर्शाळ, बाण अशा सुळक्यांवर यशस्वी मोहिम केल्या.

इतर संस्थांशी परिचय करुन घेण्याचा आणि संवाद साधण्याचा प्रयत्न धनंजयने जाणीवपूर्वक केला. दुर्ग मित्र संस्थेच्या श्रमदान शिबिरांमधे सहभाग, संस्थेच्या हिमालय ट्रेकमध्ये कॅम्प लिडरची जबाबदारी, १९८७ मध्ये पश्चिम घाट बचाव आंदोलनातीलसहभाग, ८७ ते ९२ दरम्यानच्या सुधागड किल्ल्यावरीलदुर्ग मित्र, स्लिपर हायकर्स आणि केव्ह एक्सप्लोरर्सच्या श्रमदानात शिबिरात सहभाग हे सर्व धनंजयच्या संपर्क माध्यमातून निसर्ग मित्रला साधता आले.

सामाजिक कार्यातही निसर्गमित्रने आपले योगदान दिलेले आहे. १९८९ मध्ये पुरग्रस्तांसाठी मदतकार्य, ९३ मधीलतळोजा विमान अपघात प्रसंगी मदत कार्य, प्रबळ बचाव आंदोलन, ९७ मधीलमेळघाट कुपोषित मुलांसाठी मदतकार्य इत्यादी सामाजिक कार्य धनंजयच्या नेतृत्वाखाली पार पडलेले आहे.

१९९८-९९ नंतर संस्थेच्या कार्यभार तरुण वर्गाकडे सोपवून जलसाक्षरता अभियान, तळी वाचवा मोहिम, वृक्ष गणना, गांडुळ शेती, व्हॅली क्रॉसिंग असे अनेक उपक्रम सुरु केले.

हिमालयातीलमोहिमांमध्ये धनंजयचा सहभाग होता. १९८७ मध्ये धोदीतीलट्रेक, ८९ मध्ये अन्नपुर्णा ट्रेक, ९४ मध्ये चंद्रखानी पास ट्रेक, ९८ मध्ये बेसिक कोर्स, २००० साली भागिरथी दोन मोहिम अशी धनंजयची हिमालयातीलकामगिरी आहे.

२००५ मधे पनवेलते कन्याकुमारी सायकलप्रवास हा पूर्णपणे वेगळा उपक्रमही केला.

गिर्यारोहण क्षेत्रातीलश्री. धनंजय मदन यांच्या या योगदानाबद्दलगिरिमित्र गिरिभ्रमण सन्मान देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

## गिरिमित्र सामाजिक कार्य
## राजमाची ग्रामसहाय्य योजना

लोणावळ्यापासुन १५ कि.मी. अंतरावर राजमाची किल्ला आहे. तेथेच महादेव कोळी जमातीचे १५ घरांचे उढेवाडी गाव वसलेले आहे. या गावाच्या विकासासाठी १९७६ पासून 'राजमाची ग्रामसहाय्य योजना' ही संस्था कार्य करीत आहे. वैद्यकीय तपासणी शिबिरे, शिक्षणाच्या सोयी, पिण्याच्या पाण्याची योजना, घरांची सुधारणा, कुटीर योजना, रोजगाराच्या संधी अशा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामस्थांचे जीवनमान उंचावण्याचे महत्वाचे कार्य यशस्वीपणे सुमारे १७-१८ वर्ष सातत्याने त्यांनी केले आहे.

या ग्रामसुधार प्रकल्पांसोबतच राजमाचीच्या श्रीवर्धन आणि मनोरंजन या बालेकिल्ल्याच्या संवर्धनाचे महत्त्वाचे कार्यही या संस्थेने केले आहे.

राजमाची ग्राम सहाय्य योजना संस्थेच्या या सामाजिक कार्यासाठी गिरिमित्र सामाजिक कार्य सन्मान देऊन संस्थेचा गौरव करण्यात आला.

# गिरिमित्र संमलेन - २००६

## गिरिमित्र जीवनगौरव
## श्री. जगदीश नानावटी

महाराष्ट्रात तंत्रशुध्द गिर्यारोहणाचे बीज कोणी रोवले तर ते जगदीशभाईंनी १९५४ पासून जरी भटकंतीचे वारे वाहू लागले होते तरी त्याला एक शास्त्रीय बैठक मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य जगदीश नानावटींनी केले. १९५९मध्ये बेसिक कोर्स पूर्ण केल्यानंतर असेच प्राथमिक शिक्षण मुंबई व परिसरात मिळावे या उद्देशाने मुंब्रा रॉक नर्सरीत प्रस्तरारोहण शिबिरांची सुरुवात केली. याच दरम्यान मुंबईत क्लाईंबर्स क्लब स्थापण्यात जगदीशभाईंचा पुढाकार होता.

क्लाईंबर्स बुलेटिन संपादना द्वारे गिर्यारोहण साहित्यात त्यांनी मोलाची भर घातली. काही काळ ते क्लाईंबर्सक्लबचे अध्यक्षदेखील होते.

जगदीशभाईंची हिमालयीन कारकीर्द अगदी १९५६ च्या कौरीपास ट्रेक पासून १९९२ च्या पंचाचुली व्हॅली पर्यंत अखंड सुरु होती. निलिगिरी पर्वत मोहीम १९६१ ही महाराष्ट्रातून निघालेली पहिलीच हिमायलीन मोहिम होती. क्लाईबर्स क्लबच्या सुरुवातीच्या कारकीर्दीनंतर जगदीशभाई हिमालयन क्लबमध्ये कार्यरत झाले. द हिमालयन क्लबचे सेक्रेटरी, अध्यक्ष अशी महत्त्वाची पदें त्यांनी भूषविली आहेत. अल्पाइन क्लब लंडनचेदेखील ते सभासद आहेत.

जगदीशभाई यांचे सर्वात महत्वाचे व उल्लेखनीय कार्य म्हणजे माऊंटेनिअरींग क्लेम्सचे व्हेरिफिकेशन आजपर्यंत तब्बल ५० एक मोहिमांचे व्हेरिफिकेशन त्यांनी केले आहे. आय. एम. एफ. च्या माऊंटेनिअरिंग कमिशनचे ते सल्लागार देखील आहेत.

गिर्यारोहणाबरोबरच ते विविध सामाजिक कार्यातदेखील सहभागी आहेत. नानावटी हॉस्पिटल आणि नानावटी एज्युकेशन ट्रस्टचे सभासद आहेत,

गिर्यारोहणाच्या सर्वांगीण प्रसारास, वाढीस विविध माध्यमातून केलेल्या योगदानाकरीता श्री. जगदीश नानावटी यांना गिरींमित्र जीवनगौरव सन्मानाने गौरविण्यात आले.

## गिरिमित्र जीवनगौरव (मरणोत्तर)
## स्व. श्री. अरूण सामंत

अरुण सामंत यांच्या गिर्यारोहण कारकीर्दीवर नुसती नजर टाकली तरी कोणाचेही डोळे विस्फारुन जातात. केवळ ३० वर्षाच्या कालावधीत अरुणने तब्बल४३ हिमालयीन मोहिमामध्ये भाग घेतला होता.

पदापर्णातच म्हणजे चक्क वयाच्या विशीत १९७० मध्ये बथेरटोलीच्या महत्त्वाच्या मोहिमेत त्यांचा सहभाग होता. मोहिमेतीलजिवलग सहकाऱ्याच्या दुर्देवी अपघातानंतर खरं तरं एखादा डगमगून जायचा पण या अनुभवाने अरुण हिमालयाच्या आणखीनच जवळ गेले. गढवालहिमालय, स्पिती खोरे, इस्टर्न काराकोरम, आणि किनौर परिसरात त्यांनी तब्बल२६ छोटी मोठी शिखरं सर केली. बथेरटोली, स्वर्गरोहीणी १, कागभूषण, माना नॉर्थ फेस अशा सुमारे ७ शिखरांवर चढाईचा प्रयत्न केला. अरुणच्या कारकीर्दीतीलमहत्त्वाच्या मोहिमांना सुरुवात झाली ती ९० च्या दशकात. तत्पूर्वी १९७५ मध्ये ते इंडो-ब्रिटीश सियाचीन मोहिमेत सहभागी झाले होते. तर स्वर्ग रोहीणी १, माना नॉर्थ फेस, सुईटिला, स्पीती, चांगो अशा हिमालयीन मोहिमांचे नेतृत्व अरुणने ९१-९९ च्या कालावधीत केले.

अरुणने हिमालयीन मोहिमांमध्ये कायम नवनवीन प्रयोग करण्यावर भर दिला. विविध मोहिमांचा अभ्यास ते सतत करीत असत.

गिर्यारोहणाबरोबर विपुललिखाणदेखीलत्यांनी केले आहे. अल्पाईन जर्नल, हिमालयन जर्नलमध्ये त्यांचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. हिमालयाबरोबरच सह्याद्रीतदेखीलत्यांची प्रचंड भटकंती झाली आहे. 9ट्रेक द सह्याद्री"च्या पहिल्या काही आवृतीत त्यांनी रेखाटलेले नकाशे सर्वांनाच सदैव उपयुक्त ठरले आहेत.

हिमालयन क्लबमघध्ये अरुणने कमिटी मेंबर, ट्रेझरर, इक्विपमेंट ऑफीसर, सेक्रेटरी अशा विविध पदांवर काम केले आहे. ते अल्पाइन क्लब, लंडनचे सभासद होते.

गिर्यारोहण क्षेत्रातील अरुण सामंत यांच्या भरीव योगदानाबद्दलत्यांना गिरिमित्र जीवनगौरव (मरणोत्तर) सन्मानाने गौरविण्यात आले.

## गिरिमित्र गिर्यारोहक - १
## श्री. आनंद पाळंदे

इतिहासाची आवड, इतिहास अभ्यासक बंधूचा सहवास आणि भारत इतिहास संशोधन मंडळातीलवावरामुळे १९६५ पासून आनंदची सह्याद्रीतीलडोळे भटकंतीला खरी सुरुवात झाली. पुण्या मुबईतीलविविध संस्था व व्यक्तींच्या मार्गदर्शनामुळे गिर्यारोहण क्षेत्राशी परिचय झाला. १९७५ साली प्रशिक्षण कोर्समुळे साहसाला दिशा मिळाली.

त्यानंतर ओघानेच हिमालयीन मोहिमा सुरु झाल्या. 9गिरिभ्रमण" संस्थेच्या माध्यमातून श्रीकैलाश मोहिम, मनाली परिसरातीलकाही शिखरं सर करण्यात आली. १९८२ मध्ये समविचारी सहकाऱ्यांबरोबर 9गिरिप्रेमी" संस्थेची स्थापना आनंदने केली. पाठोपाठ लिओपार्गियलया शिखरावर यशस्वी चढाई करण्यात आली, तर बिधान पर्वतावर केवळ चारचजणांच्या तुकडीने यशस्वी आरोहण केले.

हिमालयीन मोहिमा फारशया झाल्या नसल्या तरी त्याने 9गिरिप्रेमीं" च्या माध्यमातून अभ्यासू मार्गदर्शकाची भूमिका उत्तमपणे बजावली.

हिमालयाच्या सोबतीलाच सह्याद्रीच्या दऱ्या डोंगरातीलअविरत भटकंती चालूच होती. भटकंतीच्या अनुभवाच्या आधारे आनंदने स्वराज्य, सकाळ, महाराष्ट्र टाइम्स अशा विविध वृत्तपत्रांमध्ये विपुललिखाण सुरु केले. अभ्यासू भटकंती, इतिहासाचा मागोवा आणि या सर्वांला भूगोलाची जोड यामुळे सह्याद्रीचे एक अनोखे रेखाटन तयार झाले होते. त्यातूनच १९९४ मध्ये किलल्यांना डोंगरयात्रांमध्ये" गुंफणारे 9डोंगरयात्रा" हे अनोखे पुस्तक साकारले. तब्बलचार आवृत्या निघालेल्या या पुस्तकास न. चिं. केळकर पुरस्काराने गौरविण्यात आले.

त्याच जोडीने गिरिदुर्गांच्या पहाऱ्यातून आव्हान, रोमांचक गिर्यारोहण, दुर्ग तोरणा, चढाई उत्तराई अशी गिर्यारोहण विषयक अनेक पुस्तकं आनंदाने लिहली.

गिर्यारोहण क्षेत्रातीलआनंद पाळदे यांच्या या योगदानाबद्दलत्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने गौरविण्यात आले.

## गिरिमित्र गिर्यारोहक - २
## श्री. श्रीकांत ओक

खडा-पारशी-वानरलिंगी वरीलआरोहण म्हटले की हमखास डोळ्यासमोर नाव येते ते श्रीकांत ओकचे १९८२ साली महाराष्ट्रात सर्वप्रथम झालेल्या कृत्रिम आरोहणाच्या पद्धतीने प्रस्तरारोहणात नवे दालन खुले केले. पण श्रीकांतने त्याहीपूर्वीच गिर्यारोहणातीलवाटचालीत वैशिठ्यपूर्ण कामगिरी केली होती.

ओवळेकर सरांच्या मार्गदर्शनाखाली १९७५ मध्ये श्रीकांतने सर्वप्रथम प्रस्तरारोहण शिबिरात भाग घेतला व त्याला डोंगराचे वेडच लागले. पुढे उत्तरकाशी येथील9निम“मधून बेसिक व ॲडव्हान्स कोर्स उच्च श्रेणीत पूर्ण केल्यावर हिमालयातीलभटकंती देखीलसुरु झाली. तत्पूर्वी श्रीकांतच्या चारजणांच्या चमुने हडबीच्या शेंडीवर १९७९ मध्ये यशस्वी आरोहण केले हे महाराष्ट्रातीलदुसरे प्रस्तरारोहण होते.

१९७९ मध्येच त्याने खास मुलांसाठी फ्रे हिमशिखरावर विशेष मोहीम आखली. अशा प्रकारची मुलांसाठीची ही पहिलीच मोहिम होती. पाठोपाठ १९८२ मध्ये जोगीन, मकरबेह (१९८३) स्वर्गरोहीणी (१९८४) कामेट (१९८६) काचंनजंगा (१९८८) अशी हिमशिखरांची चढती कमान होती. कामेटवरीलश्रीकांतची मोहिम शेर्पा विना आखलेली होती. खडा पारशीवरीलमुक्त आरोहणात तांत्रिक अडथळे निर्माण झाल्यावर परदेशी बनावटीची साधने स्थानिक पातळीवर बनवून खडा पारशी सर करण्यात आला. मार्च १९८२ मधीलया आरोहणाने कृत्रिम प्रस्तरारोहणाचे तंत्र सह्याद्रीत रुजले.

श्रीकांत एक धडाडीचा गिर्यारोहक तर होताच पण स्वत:च्या डोंगर भटकंती बरोबरच लहान मुलांना याची गोडी लागावी यासाठी त्याने लहान मुलांच्या अनेक शिबिरात उत्साहाने भाग घेतला होता.

गिर्यारोहण क्षेत्रातीलश्रीकांत ओक यांच्या या मौलिक योगदाबद्दलत्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने गौरविण्यात आले.

## गिरिमित्र गिर्यारोहक - ३
## श्री. हिरा पंडित

१९७५ साली गिर्यारोहणाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर हिराच्या डोंगरभटकंतीला योग्य दिशा मिळाली. त्यावेळी महाराष्ट्रात प्रस्तरारोहणाची शिबिरे, प्रात्यक्षिके होत होती तरी पण सुळके आरोहणास सुरूवात नव्हती. नेमके हीच उणीव भरूण काढली ती हिरा पंडीत यांनी डिसेंबर १९७८ मध्ये लिंगाण्यावर यशस्वी चढाई करून. महाराष्ट्रातील प्रस्तरारोहण क्षेत्रातील हे पहिलेच सुळका आरोहण ठरले. येथूनच सुळक्यांच्या आरोहणाचे पेवच महाराष्ट्रात सुरू झाले. हिराने तर लिंगाण्यापेक्षादेखील अधिकाधिक कठीण सुळक्यांना गवसणी घालण्यास सुरूवात केली.

माहुली परिसरातील सुळकेसमुहातील कस लागणा�या अशा भटोबा उर्फ नवरा सुळक्यावरती डिसेंबर १९८३ मध्ये पहिलेच यशस्वी आरोहण केले. पाठोपाठ १९८४ मध्ये तुंगी सुळक्यावर आरोहण केले. याच दरम्यान हिराने हिमालयातील आपल्या आरोहणाच्या कक्षा वाढविल्या. श्रीकैलाश, जोगीन �२, सेंट्रल, थेलू �कोटेश्वर, सैफी, भागीरथी �२ अशा सुमारे १५ एक हिमालयीन मोहिमा यशस्वीपणे पूर्ण केल्या. वेस्ट एक्सप्लोरर्स, नेचर लव्हर्स व हॉलिडे हायकर्स अशा वेगवेगळ्या संस्थामधून हिराने विविध उपक्रमात केले.

गिर्यारोहण क्षेत्रातील या योगदानाबद्दल हिरा पंडीत यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने गौरविण्यात आले.

## गिरिमित्र गिर्यारोहक (मरणोत्तर)
## स्व. श्री. मिलिंद पाठक

महाराष्ट्रातल्या प्रस्तरारोहण मोहिमांच्या सुवर्णकाळ म्हणजे मिलिंदची कारकीर्द होय. मे १९८४ मध्ये बेसिक माऊंटेनिअरिंग कोर्स व ऑक्टोबर १९८४ मध्ये ॲडव्हान्स कोर्स मिलिंदने ज़्त्त्क्ष मधून यशस्वीरीत्या पूर्ण केला. मुंब्रा नर्सरीतील सरावाला तंत्रशुद्धतेची जोड मिळाली आणि मिलिंदच्या प्रस्तरमोहीमांना वेग आला.

डिसेंबर १९८४ ते मार्च १९८५ दरम्यान माहुली परिसरात नेचर लव्हर्स व हॉलिडे हायकर्स ने आखलेल्या अश्वमेध मोहिमेत मिलिंदचा महत्त्वाचा सहभाग होता. लूझ बोल्डरवरील पहिले आरोहण त्याचाच नावे आहे. तर वजीर,

करवली, नवरी, नवरीची करवली असे कित्येक अजिंक्य सुळके याच मोहिमेत, त्याने सर केले. त्यानंतर मिलिंदने मागे वळून पाहिलेच नाही.

प्रस्तरारोहणाबरोबरच हिमालयातील संचारदेखील वाढला. १९८५ मध्ये पूर्वी कामेट ग्लेशिअरमधील माना पर्वताच्या उत्तर धारेवरुन आरोहणाचा प्रयत्न केला गेला. १९८६ मधील देवतिब्बा मोहिमेचे नेतृत्व तर १९९३ मधील स्वर्ग रोहीणी मोहिमेचे उपनेतेपद त्याने यशस्वीपणे पेलले. मिलिंदची खरी ओळख होत ती मात्र बाण सुळक्यावरील व कोकणकड्यावरील पहिल्या यशस्वी आरोहणाने. सर्वोच्च अशा ७१० फूटी बाण सुळक्यावर मिलिंदने पहिली मानवी पाऊले उमटवली. तर रौद्र सुंदर अशा कोकणकड्यावर सेंटर रुटने केलेले त्याचे आरोहण वाखाणण्याजोगे होते. या दोन्ही मोहिमा म्हणजे महाराष्ट्रातील प्रस्तरारोहणाच्या वाटचालीतील मैलाचे दगड ठरल्या आहेत.

प्रस्तरोहणातील मिलिंद पाठक याच्या या योगदानाबद्दल त्याला गिरिमित्र गिर्यारोहक (मरणोत्तर) या सन्मानाने गौरविण्यात आले.

## गिरिमित्र गिरिभ्रमण
## श्री. सुनिल राज

८०च्या दशकात महाराष्ट्रात गिर्यारोहणाचा प्रसार वेगाने होत होता. माध्यमाची, माहितीची दालने आजच्या सारखी खुली नसताना गिर्यारोहणातील माहिती, बातम्या, कोठेतरी शब्दबध्द होणे गरजेचे होते. नेमकी हीच उणीव लक्षात घेऊन आपल्या डोंगरमित्रांच्या पाठिंब्याने सुनिल राजने जानेवारी ८३मध्ये साहस नावाच्या त्रैमासिकाची सुरुवात केली.

सुरुवातीच्या दोन अंकानंतर जिद्द या नावाने अधिकृत नोंद करुन हे गिर्यारोहकांचे वार्तापत्र, माहितीपत्र प्रकाशित होऊ लागले. लोकांच्या घरोघरी जाऊन वर्गणी जमविणे, स्वस्त न्यूजप्रिंट डोक्यावरुन वाहून आणणे, गिर्यारोहकांच्या, भटक्यांच्या मागे लागून त्यांच्याकडून डोंगरसाहित्य जमविणे या प्रकारे, सुनिलने जिद्द चा व्याप वाढवित नेला. त्यातूनच एक गिरिप्रेमींचा मेळावा घेऊन दुर्गसंवर्धनातील दुर्ग मित्र संस्थेची स्थापना झाली. आर्थिक अडचणीच्या प्रसंगी गिर्यारोहकांनीच त्याला हात दिला आणि जिद्दची वाटचाल चालू राहिली.

जिद्द, दुर्गमित्र बरोबरच गिर्यारोहण क्षेत्रात सुनिलचे इतर उपक्रदेखील चालूच होते. अंध, मूक, बधीरांबरोबर किल्ल्यांवर १५ ऑगस्ट साजरा करणे,  तसेच त्यांच्या हिमालयातील लडाखी व शितीधर या शिखरांवरील मोहिमेत सहभागी असणे. कांचनजंगा मोहिमेत बेसकॅम्पपर्यंत सामान पोहचविण्यास मदत करणे अशी गिर्यारोहणात त्यांची वाटचाल सुरुच होती.

पण सुनिलची पहिली ओळख म्हणजे जिद्द प्रचंड जिद्दीनेच हे त्रैमासिक सुरु ठेवीत २००५ पासून त्याने त्याचे मासिकातदेखील रुपांतर केले. आज जिद्दचे ९०० वर्गणीदार महाराष्ट्राबरोबरच आंध्र, गोवा, दिल्ली व यु.एस.ए. येथे विखुरले आहेत. थोडक्यात काय तर जिद्द ही एकखांबी संस्थाच त्याने वाढविली व रौप्यमहोत्सवी टप्प्यांवर नेली.

गिर्यारोहण क्षेत्रातील या अनोख्या संस्थात्मक कार्यातील योगदानाबद्दल सुनिल राजला गिरिमित्र गिरिभ्रमण सन्मानाने गौरविण्यात आले.

## गिरिमित्र सामाजिक कार्य
## यशवंती हायकर्स, खोपोली

मुंबईत वाढीस लागलेल्या गिर्यारोहणाच्या छंदाला परिघाबाहेर रुजविण्याच कार्य मुख्यतः यशवंती हायकर्स सारख्या संस्थेच्या माध्यमातून झाले. १९८३ साली नागफणीच्या साथीने संस्थेची स्थापना झाल्यावर पदभ्रमंती, सुळके आरोहण, हिमालयीन मोहिमांना वेग आला.

१९८६ साली बोरघाटातील ट्रक अपघात प्रसंगी यशवंतीचे गिर्यारोहक कार्यकर्ते धावून गेले आणि पुढे अशा कोणत्याही संकटप्रसंगी यशवंतीचे कार्यकर्ते वेळकाळाचे भान न ठेवता त्वरेने हजर राहू लागले. गिर्यारोहणात शिकलेल्या सर्व तंत्राचा, माध्यमाचा, साधनांचा उपयोग करुन यशवंतीने आजवर २५ एक अवघड ठिकाणाच्या सहाय्य मोहिमा केल्या आहेत.

महाबळेश्वर ऑर्थर सीट, एल्फिन्स्टन पॉईट, इको पॉईट, माथेरान, वाघदा डोंगर, उत्तरकाशी भूकंप, तळोजा विमान अपघात अशा ठिकाणी रेस्क्यू ऑपरेशन्स यशवंती हायकर्सने केली आहेत. महत्त्वाचे म्हणजे माऊंटेन रेस्क्यूचे हे तंत्रज्ञान स्वतःपुरते मर्यादित न ठेवता प्रशिक्षण शिबिरांद्वारे महाराष्ट्र पोलिस, रिलायन्स, आदी बऱ्याच संस्थांना त्यांच्या अनुभवाचा लाभ घेता आला आहे.

गिर्यारोहणाबरोबरच सामाजिक कार्यातील या महत्त्वाच्या योगदानाबद्दल यशवंती हायकर्स ला गिरिमित्र सामाजिक कार्य सन्मानाने गौरविण्यात आले.

# गिरिमित्र संमेलन - २००७

## गिरिमित्र जीवनगौरव
## प्रा. आनंद चांदेकर

बालपणी ठाण्यातील शाळेच्या आसपासच्या छोट्या मोठ्या टेकड्यांनी सरांना डोंगराचे वेड लावलें. पुढे गणितातील पदव्युत्तर शिक्षणानंतर पार्लेकरांच्या सहवासात आल्यावर गिर्यारोहणाशी नाते जुळत गेले. १९५४ च्या दरम्यान सिध्दार्थ कॉलेजमध्ये असताना त्याचे मूर्त स्वरुप आलं ते इंटरकॉलेजिएट हायकर्स कल्ब च्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये गिर्यारोहणाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने चांदेकर सर व इतर महाविद्यालयातील प्राध्यापकांनी मिळून १९५४ साली स्थापलेल्या महाराष्ट्रातील या पहिल्यावहिल्या संस्थेच्या स्थापनेस सरांचा पुढाकार होता.

आपण स्विकारलेल्या या जगावेगळ्या छंदात, वेडात पारगंत होण्यासाठी चांदेकरांनी मनाली येथील ज़क्तक्ष येथे गिर्यारोहणाचे बेसिक व ॲडव्हान्स कोर्स देखील पूर्ण केले. पुढे १९६४ मध्ये इंटरकॉलेजिएटचे रुपांतर युनिर्व्हसिटी हायकर्स ॲड माऊटेनिअरिंग सोसायटी मध्ये झाले तेव्हा. सर त्याचे कार्यवाह बनले. शिवाय महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी स्थापलेल्या गिरीविहारचे ते अध्यक्षदेखील झाले. या सर्वाचा परिपाक दिसून आला तो १९६६ साली हनुमान शिखरावरील यशस्वी मोहिमेचे. महाराष्ट्रातून गेलेल्या या पहिल्या नागरी गिर्यारोहण मोहिमेचे नेतृत्व चांदेकर सरांनी केले होते. पार्लेकर गिरिप्रेमी मित्रांनी त्यांना हॉलिडे हायकर्सचे कायम सभासदत्व दिले व त्यांच्याच अध्यक्षतेखाली पुढे हॉलिडेने सह्याद्रीतील अनेक महत्त्वाचे उपक्रम यशस्वी केले.

१९७० च्या नंदाखात मोहिमेत अरोरा व प्रभू या दोन सहकाऱ्यांच्या अपघाती मृत्यूने व्यथित झालेल्या सरांनी, अरोरा प्रभू मेमोरियल ट्रस्टची स्थापना केली. गिर्यारोहकांना नवीन काही करण्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी ट्रस्टतर्फे मदत केली जाते. पुनश्च हिमालयाच्या ओढीने १९७८ मध्ये जोगीन ३ या शिखरावरील मोहिम यशस्वी केली. चांदेकर सरांनी विपुल लिखाण तर केलेच पण हॉलिडे हायकर्सच्या महाराष्ट्राची निसर्ग लेणी या पुस्तकाच्या निर्मितीत त्यांनी मोलाचे योगदान दिले.

गणिताचे उत्कृष्ट प्राध्यापक, कर्नाटकांतील ग्रामीण भागातील सामाजिक कार्य आणि गिर्यारोहणाच्या छंदापायी चाकोरी न स्विकारणे असा सरांच्या ८० वर्षाच्या कारकीर्दीच्या लेखाजोखा मांडता येईल.

प्रो. आनंद चांदेकरांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील मोलाच्या योगदानाबद्दल त्यांना, गिरीमित्र जीवनगौरव सन्मानाने गौरविण्यात आले.

## गिरिमित्र जीवनगौरव (मरणोत्तर)
## स्व. श्री. सोली मेहता

Soli S. Mehta, one of the most celebrated editors of the Himalayan Journal, belonged to Mumbai and with his connections, managed to shift the headquarters of the Himalayan Club from Calcutta to Mumbai where trekking and climbing flourished due to the proximity of the Sahyadri Ranges. Since then the Himalayan Journal, and the Himalayan Club have never looked back If one early pioneer is to be thanked. then that has to be Soli Mehta.

His legacy of meticulous research has been the reason for the authenticity and accuracy of facts

recorded in the Himalayan Journal. During his tenure, the Journal became one of the most authentic and respected international publications.

Based on his experience, Soli Mehta in collaboration with Harish Kapadia wrote a book “Exploring the Hidden Himalaya” in 1988, which immediately became a best seller as a guide-book for mountaineers.

Apart from editing, Soli was an excellent pianist and cellist. He had a degree from St. Catherine’s College, Cambridge. He traveled a lot and met many editors, trekkers and mountaineers the world over. He trekked regurlarly in the Himalaya and gave talks with excellent slides as visuals. He was Vice-President of Himalayan Club and handled all the organisation of the Club’s Diamond Jubilee Celebrations in 1988.

On 4 November 1989, Soli S. Mehta expired of a sudden heart attack at the age of 62, when he was looking forward to retired life, music, editing, writing further books, editing the Himalayan Journals and lots of fun. His inspiring memories will be cherished forever.

In recognition to his invaluable contribution to the mountaineering field, Girimitra Sammelan conferred upon him the Life Time Achievement Award (Posthumously).

## गिरिमित्र गिर्यारोहक - १
## श्री. चारूहास जोशी

१९७५ मध्ये चारुहासला डोंगर भटकंतीचे वेड लागले. गिरिविहारच्या माध्यमातून त्याच्या या वेडाची जोपासना होत गेली. सुरुवातीला मुंब्रा डोंगरातीलनर्सरी हाच चारुचा अड्डा होता. तेथे प्रस्तरारोहणाचे अनेक नवीन मार्ग शोधण्याचे श्रेय चारुकडे जाते. गिर्यारोहणाचा कोणताही प्रस्थापित अभ्यास क्रम न केलेल्या चारुने अंगभूत कौशल्याच्या आणि अनुभवाच्या आधारेच गिर्यारोहणातीलआजवरची यशस्वी वाटचालकेली आहे.

१९८३ मध्ये वानरलिंगी सुळक्यावर कृत्रिम प्रस्तरारोहण पद्धतीचा वापर करुन चारुने ती मोहिम यशस्वी केली. 9एक्सपान्शन बोल्ट“ वापरुन केलेल्या सह्याद्रीतीलया पहिल्या चढाईमुळे प्रस्तरारोहकांना एक नवे दालनच खुले झाले. सह्याद्रीतीलया अनुभवाच्या जोरावर चारुने हिमालयातीलमोहिमांमध्येही उत्कृष्ठ कामगिरी केली. फाबरांग, फ्रे पिक इत्यादी मोहिमांमध्ये त्याचा महत्वाचा सहभाग होता.

१९८८ मध्ये कांचनजंगा या जगातीलतिसऱ्या क्रमांकाच्या हिमशिखरावर आयोजित पहिल्या भारतीय नागरी मोहिमेत चारुहासचा सहभाग होता. त्या मोहिमेत ८००० मीटरपेक्षा जास्त उंचीवर कृत्रिम प्राणवायुशिवाय आरोहण करणारा तो पहिला भारतीय नागरी गिर्यारोहक ठरला.

चारु उत्तम गिर्यारोहक तर आहेच पण त्याचबरोबर उत्तम प्रशिक्षकही आहे. त्याने गिर्यारोहकांसाठी अनेक रेस्क्यु ऑपरेशन शिबिरे आयोजित केली आहेत. सध्या तो मुंबई विद्यापीठाच्या हायकिंग आणि माउंटेनियरिंग विभागाचा पॅनलमेंबर आहे. प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेली कोणतीही लौकिक शैक्षणिक पार्श्वभूमि नसतांना केवळ गिर्यारोहण व्यवस्थापनाच्या अनुभवावर चारुहास वेलिंगकर इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंटमध्ये ओ.एम.पी.डी. विभागाचे प्रमुखपद सांभाळित आहे. त्यामुळे तो आता प्रा. चारुहास जोशी झाला आहे.

श्री. चारुहास जोशी ह्यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातीलयोगदानाबद्दलत्यांना 9गिरिमित्र गिर्यारोहक“ सन्मान प्रदान करण्यात आला.

## गिरिमित्र गिर्यारोहक - २
## श्री. प्रजापती बोधणे

प्रजापतीच्या भटकंतीची सुरुवात राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून झाली. पुढे हॉलीडे हायकर्सच्या संपर्कात आल्यानंतर गिर्यारोहण विश्वाची ओळख झाली आणि भटकंतीला योग्य दिशा मिळाली. १९८३ मध्ये गिर्यारोहणाचे प्राथमिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रजापतीच्या गिर्यारोहणाने वेग घेतला.

याच दरम्यान सह्याद्रीत प्रस्तरारोहणाचे वारे वेगाने वाहु लागले होते. १९८४ च्या डिसेंबरमध्ये माहुली परिसरात आखलेल्या अश्वमेध मोहिमेत वजीर, नवरी, नवरीची करवली अशा अनेक सुळक्यांवर आरोहण केले गेले. या व अशा अनेक प्रस्तरारोहण मोहिमांच्या आयोजनात व आरोहणात प्रजापतीचा महत्वाचा सहभाग राहीला. भवानी कडा, लिंगाणा, टकमक टोक, हिरकणी कडा, बाण अशा प्रस्तरारोहणाच्या विविध आव्हानांना प्रजापती यशस्वीपणे सामोरा गेला. रायगड-राजगड-तोरणा या किल्ल्यांच्या प्रदक्षिणांमार्गांचा शोध आणि प्रदक्षिणा उपक्रमांचे आयोजन यात त्याचा सहभाग महत्त्वाचा राहिला.

याच दरम्यान प्रजापतीच्या हिमालयीन मोहिमा एकापाठोपाठ एक सुरुच होत्या. ८३ मध्ये रुदुगैरा, ८४ मध्ये मुलकिला, ८५ मध्ये माना, ८६ ला नंदाखात, ८७ मध्ये कामेट, ९० मध्ये मात्री, ९१ मध्ये पनवालीव्दार तर ९३ मध्ये कांचनजंगा (इंडो-युक्रेन संयुक्त मोहिम) अशा अनेक हिमशिखरांवरीलमोहिमांचे त्याने यशस्वीरित्या नेतृत्व केले आहे. तसेच हिमालयातीलअनेक पदभ्रमण मोहिमांच्या आयोजनात प्रजापतीचा मोलाचा सहभाग राहिला आहे. त्याने कित्येक आंतरराष्ट्रीय हिमालयीन मोहिमांमध्येदेखीलसहभाग घेतला आहे. फ्रान्स, इंग्लंड, जपान या देशांच्या गिर्यारोहण मोहिमांमध्ये संपर्क अधिकारी म्हणून त्याने काम पाहिले आहे.

नेव्हलडॉकयार्डमध्ये नोकरी करत असतानाच १९९४ पासुन नेव्हलडॉकयार्ड अॅडव्हेंचर क्लबच्या माध्यमातून डॉकयार्ड कर्मचाऱ्यांना गिर्यारोहणाची गोडी लावण्याचे काम प्रजापतीने यशस्वीरित्या पार पाडले.

श्री. प्रजापती बोधणे ह्यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातीलविशेष योगदानाबद्दलत्यांना गिरीमित्र गिर्यारोहक सन्मान प्रदान करण्यात आला.

## गिरिमित्र गिर्यारोहक - ३
## श्री. रमाकांत महाडीक

१९७७ पासुनच रमाकांतची भटकंती सुरु झाली. गेली ३० वर्षे रमाकांत हॉलीडे हायकर्स, केव्ह एक्सप्लोरर्स, नेचर लव्हर्स अशा वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून गिर्यारोहण क्षेत्रात कार्यरत आहे.

सुरुवातीला सह्याद्रीच्या डोंगररांगात रमणाऱ्या रमाचा कलउत्तरोत्तर हिमालयीन मोहिमांकडे वाढत गेला. सन १९८० मध्ये गिर्यारोहणाचे प्राथमिक प्रशिक्षण घेतल्यानंतर रमाकांतची हिमालयीन कारकिर्द सुरु झाली. १९८२ मध्ये कोटेश्वर, जून ८३ मध्ये सेंट्रलपिक तर सप्टेंबर मध्ये सुली टॉप, ८४ साली श्वेतवर्ण अशी रमाकांतची हिमालयीन मोहिमांची चढती कमान राहिली. ८५ साली ह्याच अनुभवाच्या आधारे भागीरथी - २ या हिमशिखरावरीलमोहिमेचे नेतृत्व आणि शिखरवीर अशा दुहेरी भुमिका रमाकांतनं यशस्वीरित्या पार पाडल्या १९८६ च्या जून-जुलैमध्ये रमाकांतच्या नेतृत्वाखाली सुली टॉपचे आव्हान स्विकारण्यात आले. अजिंक्य अशा सुली टॉपवरीलही पहिलीच यशस्वी मोहिम ठरली. रमाकांत सुली टॉपचा शिखरवीर देखीलआहे.

१९८७ मध्ये फाबरांग (शिखरवीर), १९८८ च्या कांचनजंगा मोहिमेत ७२७५ मीटरपर्यंत (कॅम्प-४) आरोहण, ९२ मध्ये मेंथोसा, २००४ मध्ये श्यामवर्ण बामक आदी मोहिमांमध्ये रमाकांतचा सहभाग होता. रमाकांतच्या नेतृत्वाखाली १९९१ साली गंगोत्री भागातीलअजिंक्य अशा योगेश्वर शिखरावर यशस्वी आरोहण करण्यात आले. रमाकांतने सह्याद्रीच्या कातळकड्यांवर प्रस्तरारोहणसुद्धा केले आहे. हिमालयीन गिर्यारोहण मोहिमांबरोबरच त्याने सिमला-काझा, लेह-लडाख, कारगील, श्रीनगर अशी मोटार सायकलमोहिम (जून १९९६) केली आहे.

श्री. रमाकांत महाडिक ह्यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातीलअमुल्य योगदानाबद्दलत्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान प्रदान करण्यात आला.

## गिरिमित्र गिर्यारोहक (मरणोत्तर)
## स्व. श्री. अनिल कुमार

अनिलने ७८-७९ च्या दरम्यान पोद्दार कॉलेजातीलहायकर्स क्लबच्या माध्यमातून दऱ्याखोऱ्यातीलभटकंतीला सुरुवात केली. पुढीलवर्षी दार्जिलिंग येथून त्याने गिर्यारोहणाचे प्राथमिक प्रशिक्षण घेतले. त्यानंतर अनिलच्या गिर्यारोहण मोहिमांचा धडाकाच सुरु झाला.

सह्याद्रीतीलमोहिमांबरोबरच हिमालयातीलमोहिमांचाही त्याचा वेग वाढत गेला. १९८२ मध्ये जोगीन, ८३ मध्ये मकरबेह या मोहिमा यशस्वी झाल्या. १९८५ मध्ये गिरिविहारने आखलेल्या स्वर्गरोहीणी ३ व ४ या मोहिमेचे नेतृत्व अनिलकुमारने केले. १९८६ च्या कामेटवरीलशेर्पांचा सहभाग नसलेल्या मोहिमेत अनिलने शिखरावर यशस्वी आरोहण केले. १९८८ च्या कांचनजंगा शिखरावरीलपहिल्या नागरी मोहिमेत देखीलअनिलचा महत्वाचा सहभाग होता. १९८७ ला फाब्रांग, ८९ मध्ये मेंथोसा, ९० मध्ये देवतिब्बा तर ९२ ला स्वर्गरोहीणी - साऊथ फेस आरोहण अशा विविध मोहिमांमधे त्याने सिंहाचा वाटा उचलला.

हिमालयातील मोहिमांबरोबरच सह्याद्रीतील प्रस्तरारोहणातदेखील अनिलने आपला ठसा उमटवला आहे. अनिलआघाडीचा गिर्यारोहक तर होताच, पण मोहिमांच्या व्यवस्थापनात देखीलतो वाकबगार होता. प्रस्तरारोहण शिबिरांचा कुशलप्रशिक्षक अशी त्याची ख्याती होती. गिर्यारोहणासंदर्भातीलत्याचे वाचन अफाट होते. त्यातूनच मग अल्पाइन स्टाईलएक्सपिडिशनसारखे नवनवे प्रयोग त्याच्या डोक्यात सदैव घोळत असत. गिरिविहारच्या चिल्ड्रेन ॲडव्हेंचर कॅम्पमध्ये त्याने मोलाचे योगदान दिले होते. गिरिविहारचे अध्यक्षपदही त्याने काही काळ भूषविले.

डिसेंबर ९२ मध्ये माहुली परिसरातीलभटोबा सुळक्यावर आरोहण करतांना त्याचा अपघाती मृत्यु झाला.

अनिलकुमार यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातीलयोगदानाबद्दलत्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान (मरणोत्तर) प्रदान करण्यात आला.

## गिरिमित्र गिरिभ्रमण
## श्री. उमेश झिरपे

उमेशने १९७८ मध्ये व्हॅली ऑफ फ्लॉवर्सच्या ट्रेकपासून डोंगरातीलभटकंतीला सुरुवात केली. गिर्यारोहणातीलप्राथमिक आणि प्रगत अभ्यासक्रम पूर्ण करुन त्याने आपल्या वाटचालीला योग्य दिशा मिळवून दिली. आरोहक आणि गिरिप्रेमी या संस्थातून त्याने गिर्यारोहणातीलवेगवेगळी शिखरे गाठली. सह्याद्रीतीलचाळीसहून अधिक प्रस्तरारोहण मोहिमा आणि हिमालयातीलमांदा पर्वत (नेतृत्व), भृगु पर्वत (शिखरवीर), सुदर्शन, शिवलिंग असा त्याच्या गिर्यारोहणाच्या कारकिर्दीचा चढता आलेख आहे.

गिरिप्रेमी संस्थेने १९८६ मध्ये सह्याद्रीतीलगिर्यारोहणासाठी आरोहक ही जुळी संस्था स्थापन करुन तिची जबाबदारी उमेशकडे सोपविली. ती त्याने आजतागायत यशस्वीपणे पार पाडत सह्याद्रीतीलअनेक मोहिमा आयोजित केल्या. त्यामुळे पुण्यातीलप्रस्तरारोहकांना मोलाचे प्रोत्साहन मिळाले. गेल्या सहा-सात वर्षापासून गिरिप्रेमी संस्थेची जबाबदारीही उमेशकडे आली आहे. गिरिप्रेमीच्या माध्यमातून हिमालयीन मोहिमांचे आयोजन करुन हिमालयातीलगिर्यारोहणाची गिरिप्रेमी संस्थेची उज्वलपरंपरा त्याने वृध्दींगत केली आहे.

गिरिप्रेमी व आरोहक या संस्थांच्या माध्यमातून केलेल्या कार्यासाठी श्री. उमेश झिरपे यांना गिरिमित्र गिरिभ्रमण सन्मानाने गौरविण्यात आले.

# गिरिमित्र सामाजिक कार्य
# चक्रम हायकर्स, मुलुंड

१९८२ साली मुलुंड येथे स्थापन झालेल्या चक्रम हायकर्सने गिर्यारोहण क्षेत्रात आपली वेगळी ओळख प्रस्थापित केली आहे. गिर्यारोहणातीलविविध उपक्रमांव्दारे या क्षेत्राच्या प्रसारात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. गेल्या २५ वर्षाच्या कालावधीत गिर्यारोहणाबरोबरच सामाजिक कर्तव्याची जाण ठेवत त्यांनी डोंगरदऱ्यात रहाणाऱ्या ग्रामस्थांसाठी वेळोवेळी यथाशक्ती मदतकार्य केले आहे.

२६ जुलै २००५ रोजी संपूर्ण महाराष्ट्राला अतिवृष्टीने घेरले होते. कोकणातीलगावांमध्ये महापुराने हाहा:कार माजवला होता. त्यावेळी चक्रमच्या कार्यकर्त्यांनी त्वरित मदत कार्याची योजना आखली. महाडजवळीलओंबळी आणि केवनाळे या दुर्गमतेमुळे सरकारी मदत पोहाचू न शकलेल्या गावांमध्ये त्यांनी मदत कार्य केले. तब्बल३०० कुटुंबाना ताट-वाटी, शिधा, अंधरुण-पांघरुण अशी मदत संस्थेतर्फे पुरविली गेली. केवळ दोन दिवसांत सुमारे चार लाखांचा निधी जमा करुन हे मदत कार्य केले गेले. त्याचबरोबर पनवेलजवळीलग्रामीण शाळांमध्ये २००० वह्यांचे वाटप करण्यात आले. चक्रम हायकर्सने केलेल्या या मदत कार्याबद्दलची कृतज्ञता आजही तेथीलगावकऱ्यांच्या बोलण्यातून व्यक्त होते.

चक्रम हायकर्स या संस्थेने केलेल्या या सामाजिक कार्याबद्दलगिरिमित्र सामाजिक कार्य सन्मानाने त्यांचा गौरव करण्यात आला.

# गिरिमित्र सन्मान २००८

## गिरिमित्र जीवनगौरव सन्मान
## श्री. मोतीराम व्ही. माळी

खरं तर प्राध्यापकासारखी नोकरी लाभल्यानंतर एखाद्याने छान सुखवस्तु जीवन व्यतित केलं असतं, पण माळी सरांना याच दरम्यान गिर्यारोहणाचा छंद जडला. १९५३-५४ च्या दरम्यान महाराष्ट्र ट्रेकींग अँड कल्चर सोसायटीच्या माध्यमातून सरांची भटकंती सुरु झाली. इंटर कॉलेजिएट हायकर्स, युनिवर्सिटी हायकर्स अँड माऊटेनिअर्स सोसायटी आणि गिरिविहारच्या स्थापनेत सरांचा महत्वाचा सहभाग होता. या सर्व कालखंडात सरांनी सहयाद्रीत प्रचंड भटकंती केली. प्रस्तरारोहणाचे तंत्र आत्मसात केले. प्रस्तरारोहण प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन पण केले. गिर्यारोहणाचे तंत्रशुध्द प्रशिक्षण घेण्यासाठी त्यांनी मग डब्ल्यू. एच. एम. आय. मधून बेसिक व ॲडव्हान्स कोर्स पूर्ण केले.

सरांच्या या उत्साहाला वाट मिळाली ती हनुमान मोहिमेमुळे. गिरिविहारने आखलेल्या गढवाल हिमालयातील हनुमान या अजिंक्य शिखरावरील आणि महाराष्ट्रातील पहिल्या मोठ्या नागरी मोहिमेचे उपनेतेपद सरांनी सांभाळले. या मोहिमेमुळे महाराष्ट्रातील गिर्यारोहकांना हिमशिखरांचे वेड लागले.

नंतरच्या काळात सरांनी गिरिविहारच्या माध्यमातून गिर्यारोहणाच्या प्रसारास वेग दिला. गिरिविहारचे ते बराच काळ अध्यक्षदेखील होते. रक्तातच शिक्षकीपेशा भिनलेला असल्याने माळी सरांनी महाराष्ट्रातल्या अनेक पिढयांना गिर्यारोहणाचे धडे दिले आणि आजदेखील त्यांचे हे कार्य चालू आहे. मैत्रीपूर्ण वागणूक व नम्रपणा अंगी असलेले सर आजपर्यंत अनेकांचे मार्गदर्शक ठरले. त्यामुळेच महाराष्ट्रात गिर्यारोहणाचा पाया रचनाऱ्या काही मोजक्या मंडळीमध्ये सरांचा समावेश होतो.

गिर्यारोहण क्षेत्राच्या सर्वांगीण प्रसाराकरिता व प्रगतीकरीता बहूमूल्य योगदानबद्दल प्राचार्य मोतीराम माळी यांना "गिरीमित्र जीवनगौरव सन्मान" देऊन ऋणनिर्देश करण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान
## श्री. दिलीप लागू

दिलीपचे डोंगरातले पहिले पाऊल अर्थातच सह्याद्रीच्या प्रांगणात पडले. गिरिविहारच्या माध्यमातून त्याची डोंगराशी जवळीक वाढू लागली. पुढे मात्र हिमालयाला गवसणी घालण्यावर त्याने लक्ष केंद्रीत केले. १९८२ च्या सुमारास एच. एम. आय. दार्जिलिंग येथून गिर्यारोहणाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आणि तेव्हापासून दिलीप हिमालयात रमू लागला. १९८३ मध्ये लदाखी क्षितीधर ही मनाली परिसरातील दोन शिखरं सर केली. १९८५ मध्ये कालानाग या गढवाल हिमालयातील शिखरावर यशस्वी आरोहण केले तर १९८६ मध्ये शेर्पांशिवाय आखलेल्या कामेट शिखरावर दिलीपने २२००० फुटांपर्यंत आरोहण केले व १९८७ मध्ये देवतिब्बा सर केले.

त्याच्या आतापर्यंतच्या या सर्व अनुभवाचा उपयोग झाला तो कांचनगंगा मोहिमेत. १९८८ साली गिरिविहारतर्फे आखलेल्या ८००० मीटरपेक्षा अधिक उंचीवरील हिमशिखरावरील पहिल्याच भारतीय नागरी मोहिमेचे उपनेतेपद दिलीपने यशस्वीपणे सांभाळले.

या मोहिमेनंतर मात्र दिलीपने संस्थात्मक कार्यात पुढाकार घेतल्याचे जाणवते. गिर्यारोहकांना सामग्री, शिष्यवृत्ती देणे अशासाठी स्थापलेल्या कांग्चनजंगा माऊंटेनिअरींग फांऊडेशनचा कारभार तब्बल २० वर्षे दिलीपने सांभाळला आहे. तसेच शाळकरी मुलांसाठी प्रशिक्षण देणाऱ्या रानफूल प्रकल्पाशीही तो निगडीत होता. गिरिविहार या महाराष्ट्रातील सर्वांत जुन्या संस्थेचे अध्यक्षपद तब्बल १० वर्षे दिलीपने सांभाळले आहे.

दिलीपचे आणखी एक वैशिट्य म्हणजे गिर्यारोहणातील कोणत्याही सामाजीक उपक्रमासाठी त्याची होणारी मदत. मध्यवर्ती ठिकाणी असणारे त्याचे व्यवसायाचे ठिकाण हे नावनोंदणी, संपर्क अशा सर्वच कामासाठी सर्वांना उपलब्ध असते.

गिर्यारोहण क्षेत्रातील दिलीप लागू यांच्या या कामगिरीबद्‌दल त्यांना "गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने" गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान
## श्री. अरुण सावंत

अरुणच्या डोंगरभटकंतीला १९७५ पासून सुरुवात झाली. नुसत्याच चालू असलेल्या भटकंतीला दिशा मिळाली ती गिरिविहारच्या १९७९ मधील प्रस्तरारोहण शिबिरामुळे. पुढे १९८० साली ष्र्घ्‌ येथुन गिर्यारोहणाचा बेसिक कोर्स पूर्ण केल्यानंतर अरुणची कारकिर्द जोमाने सुरु झाली.

गिरिविहार आणि हॉलिडे हायकर्सच्या माध्यामातून त्याने फ्रेंडशिप, लदाखि, मनाली, क्षितीधर, सैफी, भागीरथी अशा हिमालयीन मोहिमांमध्ये भाग घेतला. पण अरुणचा ओढा हिमालयापेक्षा सहयाद्रीकडेच अधिक होता.

१९८४ पासून त्याने सहयाद्रीमध्ये प्रस्तरारोहणाचा धडाकाच लावला. तुंगी, माहुली भटोबा, तैलबैलाची भिंत, हरिश्चंद्रगडाजवळील शेंडी सुळका, कळकराय, भिव्याची काठी अशी सुळके आरोहणाची मालिकाच सुरू झाली. त्याचबरोबर छोटया मोठया प्रस्तरभिंती देखील सर केल्या गेल्या. पण प्रस्तरारोहणात अरूणचे नाव ठळकपणे पुढे आले ते ड्यूक्स नोज अर्थात नागफणीच्या सुळक्यावरील पहिल्या यशस्वी चढाईमुळे. तब्बल ८०० फुटांच्या प्रस्तरभिंतीवर आरोहण करुन त्याने ड्यूक्सवरील पहिले यशस्वी आरोहण नोंदविले. दरम्यान कोकणकड्याची भवानीची धार, अशेरीगडाची भिंत, तैलबैल्याजवळील नवरा सुळका, धोडपची १५० फूट प्रस्तरभिंत अशी ही मालिका चढतीच राहीली.

प्रस्तरा रोहणातील कौशल्य व अनुभवाचा उपयोग अरुणने रेस्क्यू ऑपरेशनसाठी केला. १९८६ मध्ये कोकणकड्यावरील एका दुर्दैवी अपघाताच्या घटनेत अरुणने भर पावसाळयात अजस्त्र कोकणकड्यावरून रॅपलिंग करुन कड्याखालील मृतदेह खाली आणला. पुढील काळात त्याने रॅपलिंग व व्हॅली क्रॉसिंगमध्ये अनेक उपक्रम यशस्वी केले. महत्वाचे म्हणजे गिर्यारोहणातून निवृत न होता अरुण आजदेखील नव्या पिढीतील चमूबरोबर विविध उपक्रम जोमाने यशस्वी करीत असतो.

गिर्यारोहणातील अरुण सावंतच्या या मोलाच्या कामगिरीबद्दल त्यास "गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने" गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान
## श्री. प्रदीप केळकर

१९७८ च्या दरम्यान प्रदीपची डोंगराशी ओळख झाली आणि ओघानेच प्रस्तरारोहणाची देखील. त्याचवर्षी महाराष्ट्रात सुळके आरोहणास सुरुवात झाली होती. साहजिकच प्रदीपची नजर या सुळक्यांकडे वळू लागली. हॉलिडे हायकर्स व नेचर लव्हर्सच्या काही अनुभवी प्रस्तरारोहकांबरोबर १९७९ च्या डिसेंबरमध्ये त्याने लिंगाण्यावर आरोहण केले. या आरोहणामुळे प्रदीपच्या मनात निराळाच आत्मविश्वास जागृत झाला आणि तो एकापाठोपाठ एक सुळके सर करु लागला. डिसेंबर १९८४ ते ८५ च्या दरम्यान अश्वमेध मोहिमेद्वारे त्याने वजिर, लूजबोल्डर, नवरी, नवरीची करवली अशा सुळक्यांवर आरोहण केले. त्याच्या सुळके आरोहणाचा धडाका इतका होता की १९८५ मध्येच ढाकच्या बहिरीच्या सुळक्यावरील आरोहणानंतर त्याचे सुळके आरोहणाचे अर्धशतक पूर्ण झाले. मग शंभरी गाठण्याचा त्याने दृढनिश्चयच केला. बाण, टकमक, भवानी कडा, आजोबाची प्रस्तरभिंत, डयूक्स् नोज, खडा पारशी, तैलबैला, तुंगी अशी एकेक आव्हाने स्विकारीत १९९४ मध्ये मुंब्र्याच्या माकडकड्यावरील आरोहणाने सुळके आरोहणाचे शतक गाठले. या शतकी वाटचालीत सुमारे ४० सुळक्यांवरील पहिलेच

आरोहण होते.

प्रदीपच्या या सुळक्यांच्या शतकी कारकीर्दी बद्दल महाराष्ट्र शासनातर्फे श्री शिवछत्रपती पुरस्कार देऊन त्याचा गौरव करण्यात आला. प्रदीपने सहयाद्रीतील या पराक्रमाबरोबरच हिमालयातदेखील काही मोहिमा यशस्वी केल्या आहेत.

प्रदीपच्या वैयक्तिक कामगिरीबरोबरच त्याने गिर्यारोहणाचे वेड दूर कोकणात रुजविण्याचे महत्वाचे कार्य केले आहे. पुणेमुंबईकरांची कोणतीही पार्श्वभूमी नसलेल्या रत्नागिरीतील प्रदीपने स्थापलेली रत्नदुर्ग माऊटेनिअर्स आज प्रगतीपथावर आहे.

गिर्यारोहण क्षेत्रातील प्रदीप केळकर यांच्या या योगदानाबद्दल त्यांना "गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने" गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान
## श्री. संजय बोरोले

महाविद्यालयीन जीवनातच म्हणजेच १९७९ पासून संजयला डोंगराची ओळख होऊ लागली. गिरिविहारने आयोजित केलेल्या प्रस्तरोहण शिबिरातून त्याला गिर्यारोहण क्षेत्राने जणू खेचूनच घेतलं. मुंब्रा व कान्हेरीत प्रस्तरारोहणाचं कौशल्य विकसित करतानाच त्याला सह्याद्रीतील सुळके साद घालू लागले. लिंगाणा, हडबीची शेंडी असे सुळके सर करतानाच त्याची नजर आणखीन मोठ्या आव्हानांकडे वळू लागली. १९८२च्या अखेरीस अनिलकुमार बरोबर त्याने दोनवेळा वानरलिंगीवर आरोहणाचा प्रयत्न केला. अखेरीस नवीन साधनांच्या सहाय्याने कृत्रिम प्रस्तरारोहणाचे तंत्र वापरीत मार्च १९८३ मध्ये वानरलिंगीचे आरोहण यशस्वी झाले.

एव्हाना कामकाजाच्या ठिकाणीच म्हणजे टाटा पॉवर मध्ये त्याने डोंगरवेड्यांबरोबर मोहिमा सुरु केल्या. आता त्याला हिमालय साद घालू लागला होता. १९८३ ला त्याने एन.आय.एम. मधून गिर्यारोहणाचे प्राथमिक प्रशिक्षण घेतले. १९८५ मध्ये स्वर्गरोहिणी-२ हे अजिंक्य शिखर सर केले तर १९८५ मध्ये शेर्पाशिवाय आखलेल्या कामेट शिखरावर त्याने यशस्वी आरोहण केले.

या सर्वांची परिणीती म्हणजे १९८८ च्या कांचनगंगा मोहिमेतील त्याचा सहभाग. भारतातील ८००० मीटर वरील या पहिल्या नागरी मोहिमेत एक आघाडीचा आरोहक, उपनेता व क्लाईंबिंग लिडर अशा अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या त्याच्यावर होत्या. या मोहिमेच्या सरावासाठी आयोजित फाबरांग या मोहिमेत त्याने शिखरमाथा गाठला.

कांचनगंगावरील आरोहण अत्यंत खडतर होते. संजुच्या क्लाईंबिंग लिडर या नात्याने मिळालेल्या मार्गदर्शनामुळे मोहिमेने ८२०० मीटर पर्यंत आरोहण केले. स्वत: संजूने ७२७५ मीटर पर्यंत आरोहण केले पण तेथे त्याची तब्बेत बिघडली म्हणून तो खाली उतरू लागला आणि कँप २ जवळ हायपोथर्मिया या विकाराने संजयचा दुर्दैवी अंत झाला.

गिर्यारोहण क्षेत्रातील या छोट्याशा कारकीर्दीत संजय बोरोलेने बहुमोल योगदान दिले आहे, त्याचे ऋण गिर्यारोहकांवर कायम राहील. संजयच्या या योगदानाबद्दल त्याला "गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान" (मरणोत्तर) देऊन त्याच्या कार्याचे ऋणनिर्देश करण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिरिभ्रमण सन्मान
## श्री. श्रीधर दळवी

जानेवारी १९८३च्या दरम्यान युथ होस्टेलच्या हिमालयीन ट्रेकने श्रीधरची डोंगराशी ओळख झाली. ट्रेकमधील सहकाऱ्यांच्या ओळखीनेच यंग झिंगारो ट्रेकर्सशी संपर्क झाला आणि पुढे तीच श्रीधरची ओळख बनून राहिली.

संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वाटचालीकडे नजर टाकली असता लक्षात येतं की यातील प्रत्येक उपक्रम आणि श्रीधर हे अगदी एकजीव मिश्रण आहे. संस्थेमार्फत प्रत्येक प्रजासत्ताकदिनी आखला जाणारा समुहाने सुळके आरोहणाचा उपक्रम, लहान मुलांची शिबिरं, कांचनगंगा मोहिमेच्या सामग्रीची बांधाबांध, "सांगाती सहयाद्रीचा" या भ्रमंतीसाठी उपयुक्त पुस्तकाची निर्मिती, अंधमित्रांसाठी आखलेल्या तब्बल २५ सहयाद्रीतल्या मोहिमा, लदाखी व क्षितीधर ही अंधमित्रांसोबतची हिमालयीन मोहिम अशा एकूणएक उपक्रमात श्रीधराने पूर्णपणे झोकून दिले होते. इतर कोणत्याही सभा-समारंभात, उत्सवात कोणताही सहभाग न घेणारा श्रीधर गिर्यारोहणातील कोणत्याही उपक्रमास सदैव हजर असायचा.

श्रीधरने आजवरच्या कारकिर्दीत केलेल्या प्रत्येक मोहिमेला, भटकंती संस्थेचा आधार होता. वाय झेड सारख्या वेगवेगळे उपक्रम यशस्वी करणाऱ्या गिर्यारोहण संस्थेच्या २५ वर्षाच्या वाटचालीत श्रीधरने महत्वाचे योगदान दिले आहे. पद-प्रसिध्दीपासून दूर राहून संस्था वाढविणे, पर्यायाने गिर्यारोहण क्षेत्राची वाढ करणे, हेच ध्येय त्याच्या समोर आहे.

गिर्यारोहण क्षेत्रातील श्रीधर दळवी यांच्या या योगदानाबद्दल त्यांना "गिरिमित्र गिरिभ्रमण सन्मानाने" गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र सामाजिक कार्य सन्मान
## यंग झिंगारो ट्रेकर्स, मुंबई

आपण धडधाकट मंडळी डोंगरदऱ्यात मुक्तपणे भटकतो, निसर्गसौंदर्याचा आनंद लुटतो. पण केवळ एखाद्या शारिरीक कमतरतेमुळे काहींना डोंगराचा आनंद घेता येत नाही. अशाच अंधमित्राची भेट यंग झिंगारोच्या एका सभासदाशी झाली आणि त्याने ट्रेकला येणाचा हट्ट धरला. वाय झेडने हा हट्ट पुरवायचे आव्हान स्वीकारले आणि गिर्यारोहणाच्या क्षेत्रात एका वेगळ्या अध्यायाला सुरुवात झाली. १५ ऑगस्ट १९८३ साली दुर्गदुर्गेश्वर रायगडावर तब्बल २५ अंधमित्रांना स्वराज्याच्या राजधानीची अनोखी भेट घडली. पुढे मग प्रत्येक स्वातंत्र्यदिनी तब्बल २५ वर्षे हा उपक्रम अव्याहत सुरू राहिला. तुंग, राजगड, कळसूबाई, हरिश्चंद्रगड, अवंध पट्टा अशा मोहिमा झाल्या. अवंध पट्टा व हरिश्चंद्रगडावर तर तब्बल ३० अंध व १० मूकबधिरांना मिळून २ दिवासांचा ट्रेक यशस्वी केला. सहयाद्रीतील भटकतीनंतर हिमालयाकडे नजर गेली नाही तरच नवल.

मग एच.एम.आय. दार्जिलिंग येथे वाय झेडच्या सहकार्याने १२ जणांच्या दोन तुकडयांनी गिर्यारोहणाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. तसेच महिलांच्या एका तुकडीने देखील हा खडतर अभ्यासक्रम पूर्ण केला. प्रशिक्षणाचा कस लागला तो हिमालयीन मोहिमेत. संस्थेच्या दहाव्या वर्धापनदिनाचे निमित्त साधून लदाखी (१७५०० फूट) व क्षितीधर (१७२२२ फूट) या हिमशिखरांवर मोहिम आखण्यात आली. १० अंध व १ मूकबधिर गिर्यारोहकांच्या तुकडीने या दोनही शिखरांवर यशस्वी आरोहण केले. गिर्यारोहणाच्या जागतिक इतिहासात नोंदविला गेलेला असा हा पहिलाच उपक्रम होय.

"यंग झिंगारो ट्रेकर्स" च्या या सामाजिक योगदानबद्दल त्यांना "गिरिमित्र सामाजिक कार्य" सन्मानाने गौरविण्यात येत आहे.

## उत्कृष्ट गिर्यारोहक २००७-०८
श्री. आनंद माळी

## उत्कृष्ट प्रस्तरारोहक २००७-०८
श्री. कृष्णा ढोकळे

# गिरिमित्र सन्मान २००८

## गिरिमित्र जीवन गौरव सन्मान
## श्री. रमेश देसाई

महाराष्ट्रात जेव्हा डोंगरभटकंतीच्या वेडाचा मागमूस ही नव्हता तेव्हा १९५३ च्या दरम्यान रमेश देसाई, यांची डोंगराशी तसेच गिरिजनांशीही ओळख झाली. पुढे मुंबई विद्यापीठामध्ये 'इंटर कॉलिएट हायकर्स क्लब' सुरू करण्यात देसाई सरांनी पुढाकार घेतला. साधारण १९६२ पर्यंत सरांनी सह्याद्रीतल प्रचंड भटकंती केली. महत्त्वाचे म्हणजे आपल्या गिरिभ्रमणाच्या सविस्तर नोंदी केल्या एवढेच नव्हे तर जेथे जाऊ तेथील परिसराचा नकाश तयार करणे हा सरांचा आणखीन एक गुणविशेष.

१९६३ मध्ये 'युनिर्व्हसिटी हायकर्स अॅंड माऊटेनिअरींग सोसायटी' या विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त गिर्यारोहण संस्थेच्या स्थापनेत देसाई सरांनी महत्त्वाची भूमिका निभावली आहे. याच संस्थेच्या माध्यमातून १९६४ ते ६८ दरम्यान तयार केलेल्या माहिती पुस्तकांमध्ये सरांनी अथक परिश्रमाने तयार केलेले नकाशे, डोंगररांगाची विस्तृत माहीती देणारी तक्ते, यांचा प्रामुख्याने समावेश केला होता. ही माहिती पुस्तकं सह्याद्रीच्या डोंगररांगाचे पहिलेच अधिकृत दस्तऐवजीकरण म्हणावे लागेल. युनिर्व्हसिटी हायकर्सच्या सचिवपदाच्या कारकीर्दीत सरांनी अनेक तरूणांना डोंगरांत जाण्यास उद्युक्त केले.

पुढे सरांनी गिर्यारोहणाचे प्राथमिक व प्रगत अभ्यासक्रम पूर्ण केले. १९६५ मध्ये गिरिविहार संस्थेने आखलेल्या 'हनुमान' हिमशिखरावरील गिर्यारोहण मोहिमेत सरांचा महत्त्वाचा सहभाग होता. महाराष्ट्रातून संस्थात्मक पातळीवर आखण्यात आलेली ही पहिलीच गिर्यारोहण मोहीम होती. त्यानंतर १९६८ मध्ये 'मिलाम' ग्लेशिअरच्या मोहिमेत सरांचा सहभाग होता. १९७० मध्ये 'बथरटोली' या हिमशिखरावर आखलेल्या महत्वाकांक्षी मोहिमेचे नेतृत्त्व सरांनी केले होते. बथरटोली साऊथ वर सरांनी यशस्वी आरोहण केले.

यानंतर काळात सरांनी मुख्यतः अभ्यास, व्यासंग व लिखाणांवर भर दिला. सर्व ट्रेकर्सनी मिळून तयार केलेल्या 'ट्रेक द सह्याद्रीज्' च्या पहिल्या आवृत्तीत देसाई सरांनी काढलेले डोंगररांगाचे नकाशे, 'सह्याद्री इनव्हाइटस् यू' सारखे लेख यांचा समावेश आहे.

या सर्व काळात सरांचे गिर्यारोहणावरील वृत्तपत्रीय लिखाण सुरू होतेच, इतकेच नाही तर सरांनी, तब्बल दहा वर्षे देशविदेशातील गिर्यारोहण विषयावरील अनेक पुस्तकांचे परिक्षण टाईम्स ऑफ इन्डियामध्ये चिकित्सकपणे केले आहे. १९७०-८० दरम्यान युनेक्सोतर्फे ग्लेशिअर अभ्यासाच्या विशेष प्रकल्पात सरांचा सन्मानांने समावेश करण्यात आला होता. दरम्यानच्या काळात सरांनी पर्यावरण संबंधीत विषयांवर सखोल अभ्यासाअंती अनेक लेख लिहले. त्याचीच परिणिती 'वाघ आणि माणूस' या प्रसिद्ध पुस्तकात झाली. या पुस्तकास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे.

'शिवाजी द लास्ट फोर्ट आर्कीटेक्ट' या पुस्तकाची निर्मिती देसाई सरांना करण्यास सांगून महाराष्ट्र परिचय केंद्राने त्यांच्या व्यासंगाचा बहुमान केला आहे.

सामाजिक बांधिलकीच्या भावनेने सरांनी सांगलीतील 'बळीराजा धरण' चळवळ, 'पश्चिम घाट बचाव आंदोलन', 'गोवा मुक्ती संग्राम', 'कृष्णा परिक्रमा' अशा अनेक चळवळीमध्ये प्रत्यक्ष सहभाग तसेच लिखाणद्वारे जनजागरणाचे कार्य केले आहे.

नुकतेच सरांचे 'तिसरा ध्रुव' हे एव्हरेस्टवरील अतिशय अभ्यासपूर्ण पुस्तक प्रकाशित झाले आहे. एव्हरेस्टबरोबर संपूर्ण हिमालयाची साद्यंत महिती असणारे हे मराठीतील एकमेव पुस्तक होय.

गिर्यारोहण क्षेत्राच्या सर्वांगीण प्रगती व प्रसाराकरीता दिलेल्या बहूमूल्य योगदानाबद्दल
श्री. रमेश देसाई यांना गिरिमित्र जीवनगौरव सन्मान देऊन ऋणनिर्देश करण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान
## श्री. वसंत लिमये

वसंत लिमयेची डोंगराशी प्रथम ओळख झाली ती १९७१ मध्ये. सह्याद्रीतील अनेक पदभ्रमण मोहिमा व प्रस्तरारोहणातून त्याचे डोंगराचे वेड वाढत गेले.

१९७६ मध्ये गिर्यारोहणाचे प्राथमिक शिक्षण व १९७८ मध्ये प्रगत शिक्षण पूर्ण केल्यानंतर वसंताचा कल हिमालयाकडे झूकू लागला. आयआयटीच्या १९७९ जोगिण हिमशिखर मोहिमेचे नेतृत्त्व वसंताने समर्थपणे पेलले. त्यातूनच त्याच्यातील नेतृत्त्व गुणाची वाढ होऊ लागली. मे १९८१ मध्ये जोगिणवरील अल्पाइन पद्धतीची मोहिम, मे ८२ मध्ये कालबलंद मोहिम, तर ९४मध्ये कामेट शिखर मोहिम या व अशा सुमारे १२ हिमालयीन मोहिमांचे वसंताने यशस्वी नेतृत्व केलं आहे.

याच दरम्यान १९८५ मध्ये कोकणकड्याचे आव्हान वसंताच्या नेतृत्वाखाली स्विकारलं गेले. कोकणकड्याच्या उत्तर धारेने अतिशय अवघड मार्गाने कोकणकड्यावर प्रथमच यशस्वी आरोहण करण्यात आलं.

वसंताच्या गिर्यारोहण कारकीर्दीवर कळस चढविला तो १९८८ मधील कांचनगंगा या जगातील तृतीय क्रमांकाच्या हिमशिखर मोहिमेमुळे. कांचगंगावरील ही पहिली भारतीय नागरी मोहिम होती. अतिशय महत्तवाकांक्षी व खडतर अशा या मोहिमेचे नेतृत्त्व त्याने लिलया पेललं.

१९८९ मध्ये वसंताने खास विद्यार्थ्यांसाठी 'रानफुल' संस्थेची सुरवात केली. रानफुलमुळे त्या काळातील अनेक विद्यार्थांना साहसाची व डोंगराची आवड निर्माण झाली.

वसंतने आप्लस् पर्वतरातीमध्ये देखील प्रचंड भटकंती व आरोहण मोहिमा केल्या आहेत. डोंगरातल्या आपल्या अनुभवांवर आधारीत 'धुंद स्वच्छंद' हे अतिशय सुरेख पुस्तक त्यांने लिहले आहे.

श्री. वसंत लिमये यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने गौरविण्यात येऊन ऋणनिर्देश करण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान
## श्री. उदय कोळवणकर

१९७५ सालापासून उदयची डोंगरभटकंती सुरू झाली आणि गेली ३१ वर्षे तो या क्षेत्रात कार्यरत आहे. गिर्यारोहणाचे प्राथमिक शिक्षण त्याने १९८३ मध्ये पूर्ण केले.

१९८० ते ८५ च्या दरम्यान उदयने सह्याद्रीमध्ये अनेक प्रस्तरारोहण मोहिमा यशस्वी केल्या. १९८४ मधील माहुली परिसरातील वजीर, करवली, नवरीची करवली, लुझ बोल्डर आणि याच समुहातील इतर सुळक्यांवरील आरोहणाच्या अश्वमेध मोहिमेत उदयचा सहभाग होता. १९८३ मध्ये उदयने टाटा पॉवरमध्ये गिर्यारोहणाच्या प्रसारासाठी टाटा पॉवर ट्रेकींग क्लबची स्थापना केली.

१९८८ साली जगातील तिस□या क्रमांकाच्या कांचनगंगा हिमशिखरावर आखलेल्या पहिल्याच भारतीय नागरी मोहिमेत त्याचा समावेश होता. या मोहिमेत उदयने ८००० मीटरपेक्षा जास्त उंचीवर कृत्रिम प्राणवायुशिवाय आरोहण केले. त्यानंतर याच अनुभवाच्या जोरावर त्याने १९९२ मधील अंध व मुक□धीर गिर्यारोहकांच्या जगातील पहिल्या हिमालयीन मोहिमेचे उपनेतेपद यशस्वीपणे सांभाळले.

कांचनगंगा मोहिमेसाठी वापरण्यात आलेली सर्व साधनसामग्री कांचनगंगा माऊंटेनिअरींग फॉऊडेशनच्या

माध्यमातून सर्व गिर्यारोहकांना वापरण्यास उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या साधनसामग्रीची देखभाल करणे, साफसफाई व दुरूस्ती इ. कामे १९८८ पासून आजपर्यंत उदय सेवाभावी वृत्तीने करत आहे. त्यामुळेच महाराष्ट्रातील अनेक गिर्यारोहण संस्थांना मोलाची मदत मिळाली आहे.

१९९८ मध्ये एव्हरेस्टवरील पहिल्या यशस्वी भारतीय नागरी मोहिमेचे उपनेतेपद उदयने चोखपणे सांभाळले.

श्री. उदय कोळवणकर यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना □गिरिमित्र गिर्यारोहक□ सन्मान देऊन ऋणनिर्देश करण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक
## श्री. संजय डोईफोडे

संजयने १९८५ □८६ मध्ये गिर्यारोहणातील प्राथमिक आणि प्रगत अभ्यासक्रम पूर्ण केला आणि त्यानंतर त्याने मागे वळून पहिलेच नाही.

सह्याद्रीतील नागफणी, खडापारशी, लिंगाणा, तैलबैला, कळकराय इ. सुळक्यांवर संजयने यशस्वी आरोहण केले. सिंहगडाच्या खांद कड्याचं अतिशय अवघड असं रूट ओपनिंगचं आव्हान त्यानं लिलया पेललं. १९८५ मधील ट्रान्स सह्याद्री मोहिमेतही तो सहभागी होता.

१९८५ ते २००७ च्या दरम्यान फ्रेंडशीप, हनुमान तिब्बा, प्रियदर्शनी, सुदर्शन, भृगू पर्वत, कामेट अशा अनेक मोहिमा संजयने यशस्वी केल्या. १९९२ मध्ये संतोपंतवरील पहिल्या यशस्वी भारतीय नागरी मोहिमेत त्यांना शिखर सर केले. १९९३ मध्ये शिवलिंग शिखरावरील महत्वाकांक्षी मोहीमेत त्याचा सहभाग होता.

१९९८ मध्ये एव्हरेस्ट वरील पहिल्या भारतीय नागरी मोहिमेत संजयचा पूर्वतयारीत मोलाचा वाटा होता. गिर्यारोहण क्षेत्रातील आघाडीच्या गिरिप्रेमी, पुणे या संस्थेचे सचिवपद त्याने सांभाळले आहे. प्रस्तरारोहणास प्रोत्साहन देण्या□या आरोहक संस्थेच्या स्थापनेत संजयचा पुढाकार होता.

श्री. संजय डोईफोडे यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांचा गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान देऊन ऋणनिर्देश करण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहण (मरणोत्तर)
## कै. डॉ. डी. टी. कुलकर्णी

बी. जे. मेडीकल कॉलेजमध्ये असतानाच डी. टी. च्या भटकंतीला सुरूवात झाली. १९८२ ला त्याने गिर्यारोहणाचा प्राथमिक अभ्यासक्रम पूर्ण केला. सह्याद्रीतील प्रचंड भटकंतीबरोबरच बाण, वजीर, तैलबैला अशा अनेक अवघड प्रस्तरारोहण मोहिमा त्याने यशस्वी केल्या.

हिमालयामध्ये सुरूवातीच्या काळात १९८२ ते ८६ मध्ये हॉलिडे हायकर्सबरोबर मुलकिला, माना, नंदाखात व चंद्रभागा रेंज मोहिमामध्ये त्याचा सहभाग होता. गिर्यारोहण क्षेत्राला अधिक बळकटी येण्यासाठी १९८७ मध्ये डी. टी. ने पुण्यात 'स्पोर्टस ॲड रिसर्च फाऊडेशन' ही संस्था स्थापन केली. त्याचवर्षी कामेट, अबिगामिन व माना या शिखरांवर महत्वाकांक्षी मोहिम आखण्यात आली. त्यापैकी कामेट व अबिगामिन शिखरांवर यशस्वी आरोहण करण्यात आलं. लगेचच १९८८ मध्ये जोगिन एक व तीन हिमशिखरं सर करण्यात आली. १९८८ साली

महाराष्ट्र शासनातर्फे क्रीडा क्षेत्रासाठी देण्यात येणारा मानाचा शिवछत्रपती पुरस्कार डी. टी. च्या गिर्यारोहण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल देण्यात आला.

१९८९ मध्ये त्याने भृगपंथ मोहिम आयोजित केली, पण ती अयशस्वी झाल्याने परत १९९० मध्ये मोहिम आखून भृगपंथ शिखर सर केले.

सर्वोच्च हिमशिखर एव्हरेस्टवर पहिली भारतीय नागरी मोहिम आखण्याचा मान डी. टी. कडे जातो. १९९२ साली त्याने अतिशय जिद्दीने हा प्रयत्न केला. एव्हेरस्टच्या साऊथ कोलपर्यंत चढाई केल्यावर तेथेच डी.टी. चा दुर्दैवी मृत्यु झाला.

उण्यापुऱ्या १० वर्षांच्या गिर्यारोहणाच्या कालावधीत डी.टी. ने प्रत्येक वर्षी हिमालयात मोहिम आयोजित केली. त्याचबरोबर सह्याद्रीतील भटकंती व प्रस्तरारोहणही केले आणि संस्थात्मक कार्य करून इतरांनाही प्रोत्साहित केले.

कै. डॉ. डी. टी. कुलकर्णी यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांचा गिरिमित्र गिर्यारोहक (मरणोत्तर) सन्मान देऊन ऋणनिर्देश करण्यात येत आहे.

## गिरमित्र गिरिभ्रमण सन्मान
## श्री. पद्माकर गायकवाड

१९८२च्या दरम्यान पद्माकरची डोंगरभटकंती सुरू झाली. मुंबई विद्यापीठातर्फे प्रस्तरारोहणातील प्रशिक्षण माउँट अबू येथे तर गिर्यारोहणातील प्रशिक्षण मनाली येथे त्याने पूर्ण केले. याचाच प्रभाव म्हणून की काय पद्माकरने पुढाकार घेत के. एम. सी. कॉलेज खोपोलीमध्ये ॲडव्हेंचर क्लब सुरू केला. पुढे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यावर १९८३ मध्ये आपल्या सारख्याच समविचारी मंडळींना एकत्र आणत खोपोलीसारखा ठिकाणी यशवंती हायकर्सया संस्थेची स्थापना केली.

गिर्यारोहणाची आवड सामान्यांनमध्ये निर्माण व्हावी यासाठी पद्माकरने यशवंतीच्या माध्यमातून विविध उपक्रम सुरू केले. मुंबईहून साधनसामुग्री आणून नाममात्र शुल्क घेत खोपोलीतल्या तरूणांना प्रस्तरारोहणाचे धडे गिरवायला लावण्यात त्याने पुढाकार घेतला. साहसी खेळांना प्रोत्साहन देत विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही गिरिभ्रमंतीची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पद्माकरने सह्याद्रीतील ड्यूक्स नोज, लिंगाणा, बहिरी, वानरलिंगी असे सुळके सर केले तसेच हिमालयातील जोगीन १, २, ३, श्री कैलाश, देवतिब्बा, मकरबे अशा मोहिमा यशस्वी केल्या. आपल्या गिर्यारोहणातील कौशल्याचा उपयोग अपघात प्रसंगी करण्याची सुरूवात यशवंतीने केली. माऊंटन रेस्क्यूच्या तंत्राची जाण करून देण्यात व यशवंती हायकर्सला त्यामध्ये पारंगत करण्यात पद्माकरचा मोलाचा वाटा आहे. आज या संस्थेने रौप्यमहोत्सवी कारकीर्दीचा टप्पा ओलांडला आहे.

श्री. पद्माकर गायकवाड यांच्या या संस्थात्मक योगदानाबद्दल त्यांना गिरिमित्र गिरिभ्रमण सन्मान देऊन ऋणनिर्देश करण्यात येत आहे.

## गिरिमित्र सामाजिक कार्य सन्मान
## दुर्गमित्र

गडकिल्ल्यांच्या संवर्धनाच्या क्षेत्रात धडपडणारी काही मंडळी १९९२ मध्ये संघटीत झाली. आणि याच कार्यासाठी दुर्गमित्र संस्थेची स्थापना करण्यात आली.

विविध संस्थांमधील सुमारे ४००□५०० कार्यकर्त्यांच्या सहकार्याने त्यांनी माहुली, पेठ व तिकोना किल्ल्यांवर संवर्धनाचे अनेक उपक्रम सुमारे ७ वर्ष यशस्वीपणे रांबविले. याच कालावधीत तब्बत ४० ते ५० श्रमदान शिबिरांच्या माध्यमातून पेठ किल्ल्यावरील पाय□यांची सफाई, टाके सफाई, गुहा सफाई, माहुलीवरील मूळ दरवाजाची व देवड्यांची सफाई, तळे उपसणे, वाडा साफ करणे अशी विविध कामे करण्यात आली. दुर्ग संवर्धनाच्या माध्यमातून इतिहासाचे जतन करीत गावक□यांना समवेत घेत सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या एका अनोख्या कार्याला त्यांच्यामुळे चालना मिळाली. ख□या अर्थाने महाराष्ट्रातील दुर्गसंवर्धन कार्याला दिशा देण्याचे काम दुर्गमित्र मुळे झाले.

दुर्गमित्र संस्थेने केलेल्या या महत्त्वाच्या सामाजिक कार्याबद्दल त्यांचा □गिरिमित्र सामाजिक कार्य□ सन्मान देऊन ऋणनिर्देश करण्यात येत आहे.

## उत्कृष्ट गिर्यारोहक २००८ - २००९
## श्री. सायरस श्रॉफ

१९८५ पासून. डोंगरांच्या प्रेमात पडलेल्या सायरसने १९९० मध्ये गिर्यारोहणाचा प्रगत अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर श्रीकैलाश, अबाले, सतोपंथ आणि ग्या यासारख्या एकाहून एक अवघड हिमशिखरांवर यशस्वी आरोहण केले.

२००९ च्या मे □जून महिन्यांमध्ये हिमालयन क्लबतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'लंपाक' मोहिमेचे नेतृत्त्व सायरसने केलं. गढवाल हिमालयातील नंदादेवी परिसरातल्या कालाबंक ग्लेशिअरमध्ये असलेल्या लंपाक नॉर्थ (६१८१ मीटर) या अवघड शिखरावर प्रथमच यशस्वी आरोहण करण्यात आले. नैऋत्यकडा व दक्षिण धारेच्या मार्गाने करण्यात आलेल्या या अवघड चढाईसाठी जवळजवळ १६ रोप फिक्स करण्यात आले होते. कठीण बर्फाच्या उभ्या भिंती आणि ग्लेशिअरमधील क्रिव्हायसेस अशा सारख्या अडचणींचा सामना करीत गाडीवाट सोडल्यापासून केवळ दहा दिवसात शिखर माथा गाठण्यात आला.

सायरस श्रॉफ यांच्या हिमालयीन मोहिमांमधील या यशस्वी कामगिरीसाठी २००८ □२००९ चा उत्कृष्ट गिर्यारोहक पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात येत आहे.

## उत्कृष्ट गिर्यारोहक २००८ - २००९
## श्री. टेकराज अधिकारी

टेकराजने २००१ मध्ये सुदर्शन, २००५ मध्ये भागीरथी, २००७ मध्ये शिवलिंग या हिमशिखरांवर यशस्वी आरोहण केले.

२००८□०९ च्या मोसमामध्ये टेकराजचा तब्बल तीन हिमालयीन मोहिमांमध्ये सहभाग होता. मे २००८ मध्ये टेकराजने श्रीकंठवरील आरोहण (२०१७२ फूट), नोव्हेंबर २००८ मध्ये फ्रेंडशिप (१७,४४९ फूट) शिखरावरील हिवाळी मोहिम तर जून २००९ मध्ये जॉनली (२१,८०० फूट) या हिमशिखरावरील अत्यंत दुर्गम व अवघड असे यशस्वी आरोहण केले आहे. श्रीकंठ व जॉनली शिखरांवरील महाराष्ट्रातील हे पहिलेच आरोहण आहे.

टेकराजच्या हिमालयीन मोहिमांमधील या यशस्वी कामगिरीसाठी २००८ □२००९ चा उत्कृष्ट गिर्यारोहक पुरस्कार देऊन त्यास गौरविण्यात येत आहे.

## उत्कृष्ट प्रस्तरारोहक २००८ - २००९
## श्री. रणजित शिंदे

रणजितची प्रस्तरारोहणाची कारकीर्द २००५ पासून सुरू झाली आणि तैलबैला, कळकराय, ड्युक्स नोज अशा अवघड सुळक्यांवरील आरोहणाने ती बहरत गेली आहे.

२००८-०९ मध्ये त्याने त्यावर कळस चढविला. डिसेंबर २००९ मध्ये भूमी सुळक्यावरील चढाई यशस्वी करण्यात आली. जानेवारी २००९ मध्ये त्याने ड्युक्स नोजवरील अवघड मार्गाने सेव्हन बी प्लस श्रेणीचे आरोहण केले आहे. नोव्हेंबर २००८ मध्ये कोकण कड्यावरील अल्पाईन पद्धतीच्या प्रस्तरारोहण मोहिमेत दोन दिवसात एकूण १४०० फूट आरोहणापैकी ९०० फूटांचे रूट ओपनींग रणजितने केले.

रणजितच्या प्रस्तरारोहणातील कामगिरीसाठी त्याला २००८-०९ चा उत्कृष्ट प्रस्तरारोहक पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र शरद ओवळेकर विशेष सन्मान
## सह्याद्री मित्र, महाड

गड किल्ल्यांच्या पायथ्याचे, दऱ्याखोऱ्यातले ग्रामस्थ म्हणजे सर्व डोंगरभटक्यांचे खरे मित्र. लिंगाणा माचीवरील बबन कडू या अशाच एक डोंगरमित्राला शासकीय अनास्थेचा फटका बसला होता. लिंगाणा माची गावाच्या स्थलांतरींतां मध्ये समावेश न झालेल्या बबनची परिस्थिती पाहून महाडच्या सह्याद्री मित्र संस्थेने त्याचे घरकूल उभे करण्याचा संकल्प केला. संस्थेची गंगाजळी वापरून कामाचा शुभारंभ पण केला. पुढे इतर डोंगरवेड्यांनी, अनेक गिर्यारोहण संस्थांनी तसेच व्यक्तिंनी मदतीचा हात पुढे केला. याच मदतीतून बबनच घर आकार घेत गेलं. आणि आज बबन कडूच्या कुंटुबियांना हक्काचं घर लाभलं.

सह्याद्री मित्रने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून केलेल्या या कार्याबद्दल त्यांना गिरिमित्र शरद ओवळेकर विषेश पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र विशेष सन्मान
## कु. कृष्णा पाटील

२००९ मध्ये सर्वोच्च हिमशिखर एव्हरेस्टवर यशस्वी आरोहण केल्याबद्दल कृष्णा पाटील हिचा गिरिमित्र विशेष सन्मान देऊन गौरव करण्यात येत आहे.

# गिरिमित्र सन्मान २०१०

## गिरिमित्र जीवनगौरव सन्मान
## श्री. नारायण महाजन

साधारण वयाच्या पस्तीशी चाळीशीत सामान्य माणूस नव्या उद्योगापेक्षा आहे त्यातच समाधान मानतो. पण महाजन सर याच काळात गिर्यारोहणासारख्या जगावेगळ्या खेळाकडे खेचले गेले. चार भिंतींच्या आत शिकायला न आवडणाऱ्या या विद्यार्थ्याला शालेय जीवनात जोड मिळाली ती स्कॉउटची. मग खुल्या निसर्गाची ओढपण वाढली. सिंहगडावर, डोंगरावर भटकंती सुरू झाली. पण गिर्यारोहणाशी खरा संबंध आला तो ५० च्या दशकाच्या उत्तरार्धात. ५५-६० च्या दरम्यान मुंबईतील क्लाईंबर्स क्लबतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या गिर्यारोहण प्रशिक्षण वर्गाच्या सुरूवातीच्या तुकडीत सरांचा समावेश होता. मग गिर्यारोहणाचे वारे शिरलेल्या अशाच काही डोंगरवेड्या तरूणांच्या सहाय्याने १९६४ साली पुण्यात भारत आऊटवर्ड बाऊंड पायोनिअर्स या संस्थेची स्थापना सरांनी केली. पुण्यातील ही पहिलीच गिर्यारोहण संस्था होय. १९६६ सालीच संस्थेतर्फे सुदर्शन शिखर परीसरात मोहिम आखण्यात आली. तर ७२ साली कालिंदी शिखर सर करण्यात महाजन सरांनी यश मिळविले. महाजन सर हे हाडाचे शिक्षक असल्यामुळे गिर्यारोहण क्षेत्रातदेखील त्याचे प्रतिबिंब उमटू लागले. स्वतःच्या वैयक्तिक मोहिमांपेक्षा जास्तीत जास्त लोकांना डोंगराकडे वळविणे हेच सरांनी आपले ध्येय मानले. त्यामुळेच दरवर्षी किमान पाच-पन्नास जणांना तरी हिमालयाची वारी ते करवून आणतच. सह्याद्रीतील भटकंतीची तर गणती न केलेलीच बरी.

१९७८ मध्ये सरांनी पुणे माऊटेनिअर्स या संस्थेची स्थापना केली. गिर्यारोहणाच्या प्रसाराचे व्रत तर सुरूच होते. १९७९ साली बालकवर्ष, १९८० साली अपंग वर्षाचे औचित्य साधत विशेष मोहिमा आखल्या. मुलकीला शिखरावर महिलांची पहिलीच मोहिम, माऊंट कोलोहॉय, रूदुगैरा, एव्हरेस्ट बेस कँप, अशा अनेक मोहिमा सरांनी यशस्वी केल्या. शालेय विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी हिमालयीन ट्रेकस सरांनी मोठ्या प्रमाणात आयोजित केले. गिर्यारोहणाबरोबरच बालवीरा संघटना, महाराष्ट्र हॉकी संघटना, मुष्टीयुद्ध संघटना व रेडक्रॉस संस्थेत सरांचे मोलाचे योगदान आहे. तर धाडसाला वयाची मर्यादा नाही हे सिद्ध करणारे वयाच्या ८३ व्या व ८७ व्या वर्षी केलेले पॅरासेलिंग लिमका बुक्स ऑफ रेकॉर्डमध्ये सामाविष्ट झाले आहे.

महाजन सर आता वयाची नव्वदी पार करीत आहेत, पण उत्साह अजूनही पंचविशीच्या तरूणाला लाजवेल असा आहे. अर्थातच अंगी बाणवलेल्या स्वावलंबन, सुरक्षितता, शिस्त व सकारात्मक दृष्टीकोन या तत्वांचा त्यांना आधार आहे. स्कॉऊट हा विचार, उच्चार व आचाराने पवित्र व विश्वसनीय असतो, या स्कॉउटच्या नियमाशी ते बांधिल आहेत आणि डोंगराशी त्यांच नातं अतूट आहे. त्यामुळेच की काय पण नव्वदीत मागं वळून पाहताना काय वाटतं यावर सरांच उत्तर असतं, माग वळून बघायला वेळच कोठे आहे, अजून मला पर्वताचे शिखर चढायचं आहं.

सरांच्या याच उत्साहाने प्रेरित झालेले अनेक गिर्यारोहक आत उत्तुंग शिखरं सर करीत आहेत, तर अनेक संस्था सरांच्या मार्गदर्शनाने सुरु झाल्या आहेत.

गिर्यारोहण क्षेत्राच्या सर्वांगीण प्रगती व प्रसाराकरीता दिलेल्या बहुमूल्य योगदानाबद्दल श्री. नारायण महाजन यांना गिरिमित्र जीवनगौरव सन्मान देऊन लक्षणनिर्देश करण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान
## कु. के. सरस्वती

के. सरस्वतींना डोंगराच वेड लागलं ते मोठ्या भावाच्या मार्गदर्शनाने मग त्यांची गिर्यारोहणाची कारकिर्द आकार घेऊ लागली. बेसिक, ॲडव्हान्स, स्पेशल ॲडव्हान्स असे गिर्यारोहणाचे प्रशिक्षण त्यांनी पूर्ण केलं. तसेच एव्हरेस्ट पूर्व प्रशिक्षण व स्कीईगचे प्रशिक्षणदेखील के. सरस्वतींनी घेतल आहे.

एक्सप्लोरर्स ॲड ॲडव्हेंचर क्लब, क्लाईबर्स क्लब, ठाणे माऊटेनिअर्स क्लब, लेडीज माऊंटेनिअरींग क्लब, आय. एम. एफ. अशा विविध संस्थांमार्फत त्यांनी अनेक हिमालयीन मोहिमा यशस्वी केल्या. कालिंदी, थेलू, थारकोट, मुलकीला X, नून, कोटेश्वर रूदुगैरा, गंगोत्री I & II, भागिरथी II, कामेट आणि अबिगामिनी, स्वर्गरोहीणी I अशा मोहिमांमध्ये त्यांनी लिडर, शिखरवीर, सदस्य असा विविध प्रकारे सहभाग घेतला आहे.

१९९३ ला महिलांच्या इंडो नेपाळ एव्हरेस्ट मोहिमेत त्या लॉजेस्टिक इनचार्ज होत्या. तर १९९७ च्या, फक्त महिलांच्या ट्रान्स हिमालयीन मोहिमेत त्यांचा सहभाग होता. इंडियन माऊटेनिअरिंग फॉऊडेशनच्या संचालक मंडळात त्यांचा समावेश आहे, स्पोर्टस् क्लाईबिंगमध्ये त्यांनी राष्ट्रीय स्तरावर पंच म्हणून काम पाहिले आहे. विविध संस्थांामार्फत त्यांनी आजवर अनेकजणांना गिर्यारोहण क्षेत्राची ओळख करून दिली आहे. गिर्यारोहण क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीबद्दल तेनसिंग नोर्गे नॅशनल ॲडव्हेंचर ॲवार्ड प्रदान करण्यात आले आहे.

कु. के. सरस्वती यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान
## श्री. राजेश पाटाडे

राजेशची डोंगरातली भटकंती सुरु झाली ती १९८४ मध्ये पुणे व्हेंचर्सच्या माध्यमांतून १९८५ मध्ये गिर्यारोहणातचे प्राथमिक व १९८६ प्रगत शिक्षण पूर्ण केले तर १९८७ मध्ये इस्ट्रक्टर कोर्स पूर्ण केला. त्यानंतर राजेशने मागे वळून पाहीलंच नाही. गिरिप्रेमी, पिनॅकल क्लब, गिर्यारोहण महासंघ व रॉक क्लाईबिंग इन्सिटिट्यूट अशा विविध संस्थांच्या माध्यमांतून राजेश हिमालय व सह्याद्रीत अनेक अवघड मोहीमा यशस्वी केल्या. सह्याद्रीतील अनेक कडे सुळके राजेशने सर केले आहेत. तैलबैला सर्वबाजू, नवरा, ढाक साउथ फेस, भवानी कडा, नानाचा अंगठा, कातळधार राजमाची, सितेचा किल्ला, विसापुर पूर्वबाजू, लिंगाणा २ वेळा, भैरवगड २ वेळा अशी एकापेक्षा एक अवघड आरोहणे राजेशने पेलली आहेत. तर कोकणकडा सेंटर रुटने प्रथमच सर करणा�या चमुमध्ये राजेशचा सहभाग होता. तर २००० साली पुन्हा एकदा कोकणकडा सर केला.

सन १९८८ मध्ये थेलू व कोटेश्वर, १९९४ मध्ये अबिगामीन, २००३ मध्ये केदारडोम आदी हिम शिखरांवर त्याने यशस्वी आरोहण केले. तर १९९२ साली सतोपंथवर आखलेल्या पहिल्याच नागरी मोहीमेत त्याने यशस्वी आरोहण केले. तर भारतातील एव्हरेस्टवरील पहिल्याच नागरी मोहीमेत त्याने २५००० फूटापर्यत आरोहण केले. त्याशिवाय राजेशने मात्री, शिवलिंग, कामेट, सतोपंथ (संयुक्त मोहीम) अशा हिमशिखरांवर आरोहणाचा प्रयत्न केला.

राजेशला त्याच्या या गिर्यारोहणातील कारकीर्दीबद्दल महाराष्ट्र शासनाने श्री शिवछत्रपति क्रीडा पुरस्काराने सन्मानित केले आहे.

श्री राजेश पाटाडे यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान
## श्री सतिश आंबेरकर

सतिश डोंगराकडे वळला तो १९८१ मध्ये हॉलिडे हायकर्सच्या माध्यमातून मुळच्याच साहसी वृत्तीला गिर्यारोहणाने चांगलेच प्रोत्साहन दिले. १९८४ मध्ये गिर्यारोहणाचे प्राथमिक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सह्याद्रीबरोबरच त्याची हिमालयीन भटकंती सुरु झाली. १९८५ मध्ये भागीरथी २ हे हिमशिखर सर केले. सुली टॉप या अस्पर्शित शिखरावर पहिली पाउलं उमटविण्या□या तुकडीत त्याचा महत्त्वाचा सहभाग होता. या दोन्ही मोहिमा केव्ह एक्सप्लोर्सच्या माध्यमातून आखण्यात आल्या होत्या. सह्याद्रीतील वजीर, नवरी, लिंगाणा अशा अनेक सुळक्यांवर सतिशने यशस्वी आरोहण केले आहे, तर ड्युक् नोजच्या ८०० फूट प्रस्तर भिंतीवरील पहिल्या यशस्वी आरोहकांमध्ये सतिशचा समावेश होता.

सतिशचा प्रस्तरोहणचा अनुभव मुंबई पोलिसदलासाठी प्रशिक्षण देताना त्याला उपयोगी पडला. गिर्यारोहणाबरोबरच धरमतर ते गेटवे, उरण ते गेटवे अंतर पोहून पार करणे, मुंबई□लेह सायकल मोहिम, अपंगासाठी स्कूटर मोहिमांमध्ये त्याचा सहभाग होता.

तर सायकलवरुन ३१५ दिवसात २४ देशांना भेटी देत २५०० किमी पार करीत त्याने जगप्रदक्षिणा केली आहे. याच सायकलिंगच्या माध्यामातून मुंबई ते धारोह असा सायकल प्रवास व पुढे रामझॅक शिखर चढाई अशी मोहिम २००२ साली यशस्वी केली आहे. हाजीमलंग डोंगरावरील रेस्क्यू ऑपरेशन आणि जांभुळपाड्याच्या महापुरात १५ दिवस आरोग्य शिबिरासाठी त्याने योगदान दिलं आहे.

श्री सतिश आंबरेकर यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान (मरणोत्तर)
## श्री भरत मांगरे

भरतची भटकंती सुरु झाली ती महाविद्यालयीन जीवनापासूनच, तर बापूकाका पटवर्धन यांच्यामुळे गिरीभम्रण संस्थेच्या माध्यामातून गिर्यारोहणाची ओळख झाली. कात्रज ते सिंहगड हा रुट त्याने कितीवेळा याला खर तर गणतीच नाही. एकट्याने भटकण्याची ही त्याला हौस होती.

१९८१ मध्ये गिर्यारोहणाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर लगेचच कोटेश्वर शिखर सर केले. १९८२ मधे गंगोत्री ३ शिखर सर केले. तर १९८३ सालच्या श्री कैलाश मोहीमेत तो यशस्वी शिखरवीर ठरला १९८४ साली मात्री शिखर सर करण्याचा प्रयत्न केला.

१९८६ मध्ये गिरिप्रेमी तर्फे आखलेल्या संतोपंथवरील पहिल्या नागरी मोहिमेत डॉ. मिनू मेहता, नंदू पागे, भरत मांगरे यांचा समावेश होता. मोहिमेदरम्यान १९७०० फूट उंचीवर २१ मे रोजी पहाटे झालेल्या हिमप्रपातामुळे नंदू पागे, डॉ. मिनू मेहता व शेर्पा नयनबहादूर यांचा अपघाती मृत्यू झाला. अपघातात वाचलेले भरत मांगरे व शेर्पा नरबहादूर खाली येत असताना फ्रॉस्ट बाईट व डिहायड्रेशनमुळे भरत मांगरे यांचा मृत्यू झाला.

श्री भरत मांगरे यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने (मरणोत्तर) गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान (मरणोत्तर)
## श्री नंदू पागे

नंदूने सह्याद्रीतील भटकंती तर महाविद्यालयीन जीवनापासूनच सुरु केली पण गिर्यारोहणकडे तो वळला ते गिरीप्रेमी संस्थेच्या माध्यमातुन. सह्याद्रीतल्या भटकंतीबरोबरच लिंगाणा, व इतर काही सुळके त्याने सर केले. १९९१ मध्ये गिर्यारोहणाचे प्राथमिक शिक्षण घेतल्यावर तर दरवर्षी हिमालयीन मोहिम ठरलेलीच. १९८२ साली लिओ पार्गीआलचा तो यशस्वी शिखरवीर होता. १९८३ साली माना□गुप्त खाल□अमृत गंगा□धवला गंगा असा मोठा ट्रेक यशस्वी केला. १९८४ साली चारजणांच्या छोट्या तुकडीने बिधान पर्वत सर केला. १९८५ साली श्री कैलासपर्वत आरोहणाचा प्रयत्न अयशस्वी झाला.१९८६ मध्ये गिरिप्रेमी तर्फे आखलेल्या संतोपंथ वरील पहिल्या नागरी मोहिमेत डॉ. मिनू मेहता, नंदू पागे, भरत मांगरे यांचा समावेश होता. मोहिमेदरम्यान १९७०० फूट उंचीवर २१ मे रोजी पहाटे झालेल्या हिमप्रपातामुळे नंदू पागे, डॉ. मिनू मेहता व शेर्पा नयनबहादूर यांचा अपघाती मृत्यू झाला. अपघातात वाचलेले भरत मांगरे व शेर्पा नरबहादूर खाली येत असताना फ्रॉस्ट बाईट व डिहायड्रेशनमुळे भरत मांगरे यांचा मृत्यू झाला.

श्री नंदू पागे यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने (मरणोत्तर) गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान (मरणोत्तर)
## डॉ. मिनू मेहता

मिनूला गिर्यारोहणाचे बाळकडू त्याच्या आईवडीलांकडूनच मिळाले. त्यामुळेच वयाच्या १४ व्या वर्षापासूनच त्याची गिर्यारोहण क्षेत्राशी ओळख झाली. बापूकाका पटवर्धनाच्या सोबतीने १४ व्या वर्षीच त्याने भागीरथी□४ या मोहिमेत सहभाग घेतला. पुढे गिर्यारोहणाचा प्राथमिक अभ्यासक्रम पूर्ण केला. सह्याद्रीतली भटकंती तर सुरुच होती. गिरीभ्रमण संस्थेच्या माध्यमातून मग हिमालयीन ंमोहिमांची सुरुवात झाली. १९७८ कोलो हाय व ८१ साली मंदा या मोहीमा यशस्वी करण्यात आल्या. तर १९८९ मध्ये केदारगंगा खोरे मोहीमेचा प्रयत्न झाला. बच्छेंद्री पाल यांच्या एव्हरेस्ट मोहीमेत, मोहीम डॉक्टर म्हणून डॉ. मिनू मेहता यांचा महत्त्वाचा सहभाग होता. या मोहिमेत २६००० फूटांपर्यत ऑक्सिजनशिवाय त्याने आरोहण केले. लगोलग १९८५ साली मात्री हिमशिखरावर मोहिम आखण्यात आली पण त्यात यश आले नाही.

१९८६ मध्ये गिरिप्रेमी तर्फे आखलेल्या संतोपंथवरील पहिल्या नागरी मोहिमेत डॉ. मिनू मेहता, नंदू पागे, भरत मांगरे यांचा समावेश होता. मोहिमेदरम्यान १९७०० फूट उंचीवर २१ मे रोजी पहाटे झालेल्या हिमप्रपातामुळे नंदू पागे, डॉ. मिनू मेहता व शेर्पा नयनबहादूर यांचा अपघाती मृत्यू झाला. अपघातात वाचलेले भरत मांगरे व शेर्पा नरबहादूर खाली येत असताना फ्रॉस्ट बाईट व डिहायड्रेशनमुळे भरत मांगरे यांचा मृत्यू झाला.

डॉ. मिनू मेहता यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गिरिमित्र गिर्यारोहक सन्मानाने (मरणोत्तर) गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र गिरिभ्रमण सन्मान
## श्री संतोष कल्याणपूर

महाविद्यालयीन जीवनातच म्हणजेच १९७५ मध्येच संतोषला डोंगर भटकंतीची आवड लागली. पण गिर्यारोहणाचे शास्त्रोक्त प्रशिक्षण अथवा मार्गदर्शन लाभत नव्हते. तेव्हाच हॉलिडे हायकर्स या संस्थेशी परिचय झाला. १९८५ साली गिर्यारोहणाचे प्राथमिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर हिमालयीन मोहिमादेखील सुरु झाल्या. पुढे १९८८ मध्ये समविचार मित्रांबरोबर पिनॅकल क्लबची स्थापना करण्यात आली. १९८८ साली मॉन आणि नोरबू शिखर, १९८९ कानामो, मात्री, पनवलीद्वार, बौलजोरी धारकोट मोहिम यशस्वी करण्यात आल्या.

यानंतरच्या काळात मात्र संतोषने स्वतःच्या मोहिमांपेक्षा संस्थेच्या विस्तारावर जास्ती भर दिला. शाळा कॉलेजचे विद्यार्थी, एनसीसी छात्र यांना प्रस्तरारोहणाचे विनामूल्य प्रशिक्षण दिले. मुंबईत एका खोलीत प्रस्तरारोहणाच्या सरावासाठी कृत्रिम प्रस्तर भिंत तयार करणे, शालेय मुलांसाठी सातत्याने साहस शिबिरांचे आयोजन, रौप्यमहोत्सवी वाटचाल करणारे टकमकचे रॅपलिंग असे उपक्रम संतोषने पुढाकाराने यशस्वी केले. संस्थेमार्फत गिर्यारोहणाच्या प्रगत शिक्षणासाठी प्रोत्साहन तसेच मुंबई पोलिस दलास गिर्यारोहणाचे धडे देण्यात येत आहेत. गिर्यारोहणाबरोबरच गिरिजनांविषयाची सामाजिक बांधिलकी देखील संतोषला जाणवत होती, त्यामुळेच दुर्गम भागातील आदिवासीसाठी मोफत आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिरं, अनाथ विद्यार्थ्यांना मदत, कारगिल युध्दातील शहीदांच्या कुटुंबीयांना मदत असे उपक्रम संस्थेच्या माध्यमातून संतोषने राबवले. किल्लारी भूकंपग्रस्तांसाठी व २६ जुलैच्या पूरग्रस्तांना मदत या दोन विशेष उपक्रमात संतोषने संस्थेच्यावतीने भरीव काम केले आहे.

श्री संतोष कल्याणपूर यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील या संस्थात्मक योगदानाबद्दल त्यांना गिरिमित्र गिरिभ्रमण सन्मानाने गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र सामाजिक कार्य सन्मान
## निसर्गमित्र, पनवेल

एखाद्या संस्थेच्या स्थापनेतच त्याची ध्येय उद्दिष्टे अगदी ठळकपणे जाणवतात. त्यामुळेच पनवेल्या निसर्गमित्र संस्थेची स्थापना होते तीच मुळी कर्नाळ्याच्या डोंगरात वेताळमाळावर ६०० झाडं लावून. डोंगरातली भटकंती आणि सामाजिक जाणीवेतून पर्यावरणाची जोपसना अशी दोनही उद्दीष्टे यातून साध्य होतात.

किंबहुना १९८६ सालापासून आजपर्यंत २४ वर्षे निसर्गमित्रची वाटचाल याच बांधिलकीच्या भावनेतून सुरु आहे. रायगडाच्या महादरवाजाशी साधर्म्य असणारा सुधागडचा संपूर्ण दरवाजा मातीने भरलेल्या होता. अनेक श्रमदानाने निसर्गमित्रने ही वाट मोकळी केली, तर गडावरील दिपमाळ, मंदीर, उध्वस्त अवशेष, पाण्याची टाकी यांचे ग्रामस्थांच्या सहाय्याने जतन व संवर्धन करण्यात आले. तर प्रबळ, इर्शाळ, सोंडाई, कर्नाळा अशा आपल्या परिसरातील किल्ल्यांवर संवर्धनाची कामं सुरु आहेत. पर्यावरणाची जाणीव डोंगरभटक्यांना आपसूकच येते. त्यातूनच निसर्गमित्रने रायगड जिल्ह्यात जलसाक्षरता अभियान, कर्नाळा अभयारण्यात ५० वनराई बंधारे, बी.एन.एच.एस.च्या सहाय्याने जिल्ह्यातील शिक्षकांसाठी पर्यावरण कार्यशाळा असे अनेक पर्यावरणीय उपक्रम यशस्वी केले आहेत. इतकंच नाही तर पनवेल शहरातील ऐतिहासिक बल्लाळेश्वर तलावातील गाळ उपसून त्यांच मरण थांबविले आहे. तर शहरातील वृक्षगणनेत संस्थेचा महत्त्वाचा सहभाग राहिला आहे. महिलादिनाच औचित्य साधून कामाच्या रगाड्यात अडकलेल्या महिलांसाठी डोंगरात भटकंती, रॅपलिंग, व्हॅली क्रॉसिंग असे खास उपक्रम दरवर्षी आयोजित केले जातात. संस्थेमार्फत लिंगाणा माचीवरील बबनच्या घरासाठी व राजमाचीवरील

मनीषा उंबरेच्या शस्त्रक्रियेसाठी भरीव मदत करण्यात आली.

गिर्यारोहणाबरोबरच सामाजिक कार्यातील महत्त्वाच्या योगदानाबद्दल निसर्गमित्र संस्थेला गिरिमित्र सामाजिक कार्य सन्मानाने गौरविण्यात येत आहे.

## उत्कृष्ट गिर्यारोहक २००९-२०१०
## श्री. दिव्येश मुनी

१९८३ साली गिर्यारोहणाची कारकिर्द सुरू केलेल्या दिव्येश मुनी यांनी २००९ साली इस्टर्न काराकोरम भागात एका महत्त्वाकांक्षी मोहिमेचे नेतृत्व केले. प्लॅटू पिक (७३१० मीटर) या अजिंक्य शिखरावर २००९ च्या मोसमात भारतीय व अमेरिकन गिर्यारोहकांची संयुक्त मोहिम आखण्यात आली. अनेक गिर्यारोहकांनी प्रयत्न करूनही अजिंक्य राहिलेल्या या शिखरावर दिव्येश मुनी यांनी नवीन मार्गाने चढाई करण्याची योजना आखली. सकांग खोऱ्यातून या शिखरावर आरोहणाचा प्रयत्न करणारी ही पहिलीच मोहिम होय.

४२ दिवसांच्या प्रदीर्घ अशा या मोहिमेत ६६०० मीटर उंची गाठण्यात गिर्यारोहकांना यश आले. शिखरमाथा गाठला गेला नसला तरी तांत्रिकदृष्ट्या अवघड असा ४००० फूटांचा टप्पा पार करण्यात आला. यापूर्वी या रूटवर कोणतीच मोहिम गेली नसल्यामुळे केवळ नकाशे, फोटो यांच्या सहाय्यानेच नियोजन करूनदेखील सुरक्षित मार्ग शोधण्यात मोहिमेस यश मिळाले. इतकेच नाही तर परतीच्या मार्गावर सगांक कोल (६१०० मीटर) या महत्त्वाच्या खिंडीत प्रथम पोहचण्याचा मान मोहिमेला मिळाला. तसेच सुनझोंग कांगरी (६०१० मीटर) या अजिंक्य शिखरावर अल्पाईन पद्धतीने प्रथम आरोहणाचे नेतृत्त्व दिव्येश मुनी यांनी केले.

श्री. दिव्येश मुनी यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण कामगिरीबद्दल त्यांना २००९–१० चा उत्कृष्ट गिर्यारोहक पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे.

## उत्कृष्ट प्रस्तरारोहक २००९-२०१०
## श्री. राहुल येलंगे

गिर्यारोहणाचे प्राथमिक तसेच प्रगत प्रशिक्षण, सर्च ॲण्ड रेस्क्यूचे व इंस्ट्रक्टरचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या राहुलने २००५ पासून गिरिप्रेमी व आरोहक संस्थेच्या माध्यमातून हिमालयातील व सह्याद्रीतील अनेक मोहिमा यशस्वी केल्या आहेत.

आरोहकतर्फे गेली दोन वर्षे आखणी चाललेल्या नाफ्त्यावरील आरोहणात त्याचा समावेश प्रामुख्याने होता. जानेवारी व फेब्रुवारी २०१० मध्ये झालेल्या या आरोहणात तब्बल २७०० फूट सरळसोट कड्यावर यशस्वी आरोहण करण्यात आले. कोकणकड्याच्या डाव्या अंगास असणाऱ्या नाफ्त्याच्या पश्चिम बाजूने केलेले हे पहिलेच यशस्वी आरोहण होय. तब्बल ११ दिवस चाललेल्या या आरोहणातील सुमारे ७०ऽ आरोहण राहुलने केले आहे. विशेषतः यामध्ये मुक्त आरोहण पद्धतीचा वापर करण्यात आला.

श्री. राहुल येलंगे यांच्या प्रस्तरारोहणातील या कामगिरीबद्दल त्यांना २००९–१० चा उत्कृष्ट प्रस्तरारोहक पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे.

## गिरिमित्र शरद ओवळेकर विशेष सन्मान
## रायरेश्वर प्रतिष्ठान

एखाद्या गडाच्या पायथ्याचा गावकरी हाच त्या गडाचा खरा राखणदार. तो जेव्हा पुढे येतो तेव्हाच मग गडाच्या संवधर्ननास खरा अर्थ प्राप्त होतो. भोर येथील अशाच काही दुर्गप्रेमींनी स्थापन केलेली रायरेश्वर प्रतिष्ठान ही संस्था यांचे उत्तम उदाहरण होय. गेल्या १० वर्षापासून प्रतिष्ठानतर्फे भोर परिसरातील रायरेश्वर, केंजळ, रोहिडा, राजगड, तोरणा अशा किल्लांवर विविध संवर्धनाची कामे हाती घेऊन यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली आहेत.

रोहीडा किल्ल्यावरील रोहीडमल्ल मंदीराचा तब्बल १००० कार्यकर्त्याच्या सहाय्याने जीर्णोध्दार करण्यात आला. गडावरील टाकी, तळी, तटबंदी, बुरुज, यांची स्वच्छता करुन निगा राखण्यात आली. गडावरील पुरातन दरवाज्याच्या चौकटीत नवीन भक्कम लाकडी दरवाजा बसवून तेथे रखवालदार नेमण्यात आला. रोहीड्याबरोबरच परिसरातील रायरेश्वर, केंजळ, रायगड, तोरणा किल्ल्यावर खासदार निधीद्वारे तसेच वनखात्याच्या सहाय्याने सौर दिवे लावण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या योजनांच्या माध्यमांतून रायरेश्वर, केंजळ, रोहिडा, राजगड येथील पायथ्यांचे रस्ते पूर्ण करण्यासाठी प्रतिष्ठानने शासनास भाग पाडले आहे. रायरेश्वरवरील मंदीर जीर्णोध्दार, राजगड व तोरण्यावरील मंदीरांची निगा राखण्यात आली. रायरेश्वराच्या जंगमाना त्यांच्या जमिनी मिळवून देण्यात आल्या, तर तेथे आरोग्य शिबिर देखील आयोजित करण्यात आले. भोर परिसराबरोबरच बाणकोट, सुवर्णदुर्ग, वज्रगड या किल्ल्यांवर देखील प्रतिष्ठानतर्फे कामास सुरूवात झाली आहे.

लोकसहभातून, लोकवर्गणीतून, खासदार निधीतून तर कधी शासकीय योजनांच्या माध्यमातून रायरेश्वर प्रतिष्ठानने या गडकिल्ल्यांसाठी महत्वपूर्ण कार्य केले आहे व आजही करीत आहेत.

गिर्यारोहणाशी अनुशांगिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल रायरेश्वर प्रतिष्ठानला गिरिमित्र शरद ओवळेकर विशेष सन्मान देऊन गौरविण्यात येत आहे.